सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, ०४ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३३८ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# प्रगतीशील, विकसित महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने वाटचाल : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

मुंबई : महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात राज्यपालांच्या अभिभाषणाने झाली. विधानसभा आणि विधान परिषदेच्या सर्व सदस्यांच्या उपस्थितीत विधान भवनात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे अभिभाषण झाले. या अभिभाषणातून राज्यपालांनी प्रगतीशील, विकसित महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने राज्य शासनाच्या नेतृत्वात वाटचाल सुरू असल्याचे सांगितले.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे अभिभाषण शेतकरी, महिला, समाजातील दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी त्याचसोबत आरोग्य, रोजगार,उद्योग,पायाभूत सोयी सुविधांचे बळकटीकरणास या शासनाचे प्राधान्य आहे. राज्य शासन सर्व समाज घटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी व विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी काम करीत आहे असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या अभिभाषणात केले.

**शेतकरी हितास प्राधान्य**

राज्यपाल म्हणाले की, राज्यशासन कृषी क्षेत्रातील संधीचा विस्तार करून शेतकरी हितास प्राधान्य देणारे निर्णय घेत आहे. राज्यामध्ये सौरऊर्जा पंपांद्वारे शेतीकरीता पाणी मिळण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्याकरिता मागेल त्याला सौर पंप योजना या अंतर्गत, ३,१२,००० सौर पंप बसविले आहेत. या योजनेअंतर्गत, पाच वर्षांमध्ये शेतकऱ्यांना १० लाख सौर पंप पुरविण्यात येतील. प्रधानमंत्री-कुसुम व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना या अंतर्गत राज्यातील सर्व कृषी वाहिन्या सौरऊर्जाकृत करणारे देशातील पहिले राज्य बनण्याचे लक्ष्य महाराष्ट्राने ठेवले आहे. राज्याने केवळ नऊ महिन्यांच्या विक्रमी वेळेत १४७ मेगा वॅट एकत्रित सौरऊर्जा क्षमतेच्या एकूण ११९ वाहिन्या कार्यान्वित केल्या आहेत. जालना जिल्ह्यामध्ये,परिसरातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना पाठबळ देण्यासाठी, रेशीम कोशांची खरेदी व विक्री करण्यासाठी खुली बाजारपेठ उभारली आहे. बाजारपेठेचे बांधकाम पूर्ण झाले असून लवकरच ही बाजारपेठ शेतक-यांसाठी खुली करण्यात येईल. त्यामुळे, या भागातील रेशीम उत्पादन व उत्पादकता वाढेल.



प्रधानमंत्री किसान सन्मान योजना या अंतर्गत राज्यातील ९५ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांची लाभार्थी म्हणून निवड केली असून ८७ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना बँकांद्वारे किसान क्रेडिट कार्ड सुविधा पुरविण्यात आली आहे. या उपक्रमाचा उद्देश आर्थिक सहाय्य व कर्ज सुविधा देऊन शेतकऱ्यांना सक्षम करणे हा आहे. शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी २०२४-२५ या वित्तीय वर्षात ७४,७८१ कोटी रुपये इतके पीक कर्ज वितरित करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ५५,३३४ कोटी रुपये इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे. हे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी तत्परतेने शासन काम करीत आहे. चालू वर्षात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या योजनेअंतर्गत १२७४ जलाशयांमधून सुमारे चार कोटी घनमीटर गाळ काढला असून, तो ९५,००० एकर जमिनीवर पसरविण्यात आला आहे, त्याचा ३१,००० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना लाभ झाला आहे.प्रधानमंत्री कृषी सिंचन योजने अंतर्गत आयोजित केलेल्या वॉटरशेड यात्रेच्या माध्यमातून पाणलोट व्यवस्थापनाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करीत आहे आणि त्यातून लोकसहभागाला प्रोत्साहन देत आहे. वॉटरशेड यात्रा ८ फेब्रुवारी, २०२५ पासून सुरू झाली असून ती ३१ मार्च, २०२५ पर्यंत राज्यातील ३० जिल्ह्यांतील १४० प्रकल्पांमध्ये जाणार आहे. लोक सहभागातून शाश्वत भूजल व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी राज्यामध्ये अटल भूजल योजना कार्यक्षमपणे राबवित आहे. या योजनेअंतर्गत, संस्थात्मक बळकटीकरण, क्षमता बांधणी आणि अभिसरण घटकासाठी १३३६ कोटी रुपये इतका खर्च करण्यात आला आहे. त्यातून, १,३२,००० हेक्टरपेक्षा अधिक शेतजमीन लघु सिंचनाखाली आणण्यात आली आहे. राज्याच्या कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करणा-या शेतकऱ्यांपर्यंत विविध शासकीय योजनांचे जलद व प्रभावी वितरण सुलभ होण्यासाठी ग्रीस्टॅक-कृषी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा या नावाची एक नवीन योजना सुरु केली आहे.

शाश्वत ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी व कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी इथेनॉलचा पर्यायी इंधन म्हणून वापर करण्यावर भर देऊन, इथेनॉलचे उत्पादन व पुरवठ्याला चालना देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. २०२४-२५ या वर्षाकरिता, राज्यातील साखर कारखान्यांमार्फत तेल कंपन्यांना १२१ कोटी लिटर इथेनॉल पुरविण्याचे निर्धारित केलेले लक्ष्य पूर्ण करील. शेतकऱ्यांना सहाय्य करण्यासाठी किमान आधारभूत किंमत योजना या अंतर्गत, २०२४-२५ या हंगामात ५६२ खरेदी केंद्रांमार्फत ११,२१,३८५ मेट्रिक टन सोयाबीनची खरेदी केली आहे.

खरीप विपणन हंगाम २०२४-२५ मध्ये, सात लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक धान आणि १७१ मेट्रिक टनांपेक्षा अधिक भरड धान्य खरेदी केले आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये किमान एक स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्यासाठी मुख्यमंत्री एक तालुका एक बाजार समिती योजना राबवित आहे.डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना याअंतर्गत, वैयक्तिक सौरऊर्जा कुंपण पुरविण्यासाठी संवेदनशील गावांमधील १०,००० पेक्षा अधिक लाभार्थ्यांना १५,००० रुपयांपर्यंत अनुदान वितरित केले आहे. त्यामुळे व्याघ्र प्रकल्पाच्या सभोवतालच्या व संरक्षित क्षेत्रांतील मानव-वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी होण्यास मदत होईल. राज्यभरातील नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याची जलद पावले उचलली आहेत. ७ लाख ८० हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना ८१४ कोटी रुपये इतके आर्थिक सहाय्य वितरित केले आहे.

## ६ मार्च ते १२ मार्च २०२५ दरम्यान पंडित राघवजी प्रदीपजी मिश्रा यांची भव्य शिवमहापुराण कथा

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ : ऐतिहासीक छत्रपती संभाजी नगर मध्ये ऐतिहासिक शिव महापुराण कथेचा ऐतिहासिक सोहळा येत्या ६ ते १२ दरम्यान शहरातील मयुर पार्क येथे आयोजित करण्यात आला असून श्री कुबेरेश्वर धाम सिहोर चे पंडित राघवजी प्रदीपजी मिश्रा यांच्या वाणीतून शिव महापुराण कथा समस्त महादेव भक्तांना दुपारी १ ते ४ दरम्यान ऐकता येणार असल्याची माहिती शिवमहापुराण कथेचे आयोजक माजी उपमहपौर विजय औताडे यांनी दिली.या वेळी भाजप शहर जिल्हाध्यक्ष शिरिष बोराळकर, आयोजिक विजय औताडे, भाजप सरचिटणीस जालिंदर शेंडगे, विश्वहिंदु परिषदेचे संजय बारगजे, मंदिर पुरोहित आयामचे राजीव जहागिरदार, संत महंत आयाम चे महेश दोरवट पाटील, आदी उपस्थित होते.

६ मार्च रोजी टीव्ही सेंटर चौकातील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकास अभिवादन करून भव्य शोभायात्रेने या शिवमहापुराण कथेस प्रारंभ होईल. शिवमहापुराण कथेतून श्री शिवाय नमस्तुभ्य: चा जयघोष दुमदुमणार असून महादेव भक्तांनी मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले. ६ ते १२ मार्च दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या शिवमहापुराण कथेत राज्यभरातून आलेल्या विविध संतांचे पूजन होणार असून तब्बल दोन हजाराहून अधिक सेवेकरी आपली निस्वार्थ सेवा या शिवमहापुराण कथेत देणार आहेत. आयोजन समितीच्या वतीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्राथमिक उपचार, अग्नीशामक यंत्रणा, सुलभ शौचालय, महिला सुरक्षा, अन्नदान, निवास व्यवस्था, यासह अत्यावश्यक सेवेसाठी भाविकांनी स्वतःहून पुढाकार घेतला आहे. येणाऱ्या प्रत्येक भाविकांना चांगली सुविधा मिळावी या हेतूने या शिवमहापुराण कथेच्या परिसरात हजारो स्वयंसेवक सातही दिवस अहोरात्र कार्यरत असणार असे विजय औताडे यांनी सांगितले.

**अनाथ मुलीचा विवाह...**

आयोजक विजय औताडे यांच्या मातोश्रींच्या पुण्यस्मरणार्थ मागील २३ वर्षापासून प्रतिवर्षी भगवान बाबा बालीकाश्रमातील अनाथ मुलीचे पालकत्व स्वीकारलेली दत्तक कन्या शालिनी हिचा विवाह शुभम उद्धव कुलकर्णी यांच्याशी होणार असून १२ मार्च रोजी सकाळी १० वाजता या भव्य शिवविवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी या दोन्ही वधू-वरास शुभाशीर्वाद देण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन पालकत्व स्वीकारलेले विजय औताडे यांनी केले आहे.




# पी. एन. गाडगीळ आणि सन्स आता ठाण्यात - सुवर्ण परंपरेचा नवा अध्याय

ठाणे, प्रतिनिधी : सोन्या-चांदीच्या व्यवसायातील प्रतिष्ठित आणि विश्वसनीय नाव पी. एन. गाडगीळ आणि सन्स यांनी ठाणेकर ग्राहकांसाठी भव्य दालनाचे उद्घाटन केले आहे. २ मार्च २०२५ रोजी, श्रुष्टि प्राईम, गोखले रोड, ठाणे येथे या नव्या दालनाचे भव्य उद्घाटन करण्यात आले. ग्राहकांच्या वर्षानुवर्षांच्या मागणीमुळे हे दालन सुरू करण्यात आले असून, आता ठाणेकरांना पीएनजीच्या उत्कृष्ट सेवा आणि प्रामाणिक व्यापार नीतीचा थेट अनुभव घेता येणार आहे.

**ठाणेकरांची मागणी अखेर पूर्ण - विश्वास आणि पारदर्शकतेची परंपरा**

गेल्या अनेक वर्षांपासून पी. एन. गाडगीळ आणि सन्स यांच्याकडे ठाण्यात दालन सुरू करण्याची सतत मागणी येत होती. संस्थेच्या विश्वसनीयता, ग्राहकसेवा आणि पारदर्शक व्यापार पद्धतीमुळे ग्राहकांनी हे आग्रहाने मागितले. सोन्या-चांदीच्या व्यवसायात प्रामाणिक व्यवहार आणि उत्कृष्ट धोरणांसाठी ओळखल्या जाणाऱ्या या ब्रँडला ठाणेकरांचा अपार विश्वास आणि प्रेम मिळत आहे.

उद्घाटन सोहळ्यात उपस्थित एका ग्राहकाने सांगितले, आम्ही अनेक वर्षांपासून पी. एन. गाडगीळ आणि सन्सच्या दागिन्यांची खरेदी करत आलो आहोत. त्यांच्या शुद्धतेवर आणि विश्वासार्हतेवर आमचा पूर्ण भरवसा आहे. आता ठाण्यात दालन सुरू झाल्यामुळे आमच्यासाठी हा खूप आनंदाचा क्षण आहे.

**उद्घाटन सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद**

२ मार्च रोजी पार पडलेल्या उद्घाटन सोहळ्यात ग्राहकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. पारंपरिक तसेच आधुनिक दागिन्यांच्या अद्वितीय संग्रहाचा आनंद ग्राहकांनी घेतला. सोन्या, हिऱ्याच्या आणि चांदीच्या दागिन्यांचे विविध प्रकार, उत्कृष्ट कारागिरी आणि ट्रेंडिंग डिझाइन्स यामुळे ग्राहकांनी उत्साहाने खरेदी केली. दालनाचे उद्घाटन पी. एन. गाडगीळ आणि सन्स चे प्रवर्तक आणि संचालक श्री. अजित गाडगीळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी सांगितले,



ठाणेकर ग्राहक आमच्यासाठी नेहमीच खास राहिले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून आम्हाला ठाण्यात दालन सुरू करण्याबाबत सतत विचारणा होत होती. आम्ही ग्राहकांच्या विश्वासाला प्राधान्य देतो आणि त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा नेहमीच प्रयत्न करतो. पी. एन. गाडगीळ आणि सन्स हे केवळ दागिन्यांचे ब्रँड नसून, विश्वास आणि गुणवत्तेचे प्रतीक आहे. या नव्या दालनाच्या माध्यमातून ठाणेकरांना आमच्या उत्तम ग्राहकसेवेचा, उत्कृष्ट दागिन्यांचा आणि पारदर्शक व्यापार नीतीचा अनुभव मिळेल, याचा आम्हाला आनंद आहे. ठाणेकरांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा आणि नव्या दालनास भेट द्यावी.

ग्राहकांसाठी खास उद्घाटन ऑफर्स - ९ मार्चपर्यंत उपलब्ध, ठाणे दालनाच्या शुभारंभानिमित्त ग्राहकांसाठी खास सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. या ऑफर्स ९ मार्च २०२५ पर्यंत लागू असणार आहेत., सोन्या दागिन्यांच्या घडणावळीवर फ्लॅट २०% सूट, हिऱ्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर फ्लॅट ५०% सूट, संस्थेच्या तर्फे ग्राहकांना लवकरात लवकर या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे., पी. एन. गाडगीळ आणि सन्स - पारदर्शक व्यापाराचा विश्वासार्ह वारसा, पी. एन. गाडगीळ आणि सन्स हे केवळ उत्कृष्ट दागिन्यांसाठीच नव्हे, तर प्रामाणिक व्यवहार, पारदर्शक व्यापार नीती आणि ग्राहकसेवेसाठी प्रसिद्ध आहेत.,

**दालनास भेट देऊन खास अनुभव घ्या!**

१९३ वर्षांचा विश्वास आणि परंपरा, १००% शुद्धता आणि प्रमाणित दागिने, व्यक्तिगत आणि उच्च दर्जाची ग्राहक सेवा, अद्वितीय आणि नवनवीन दागिन्यांचा भव्य संग्रह, ठाणेकरांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे! तुम्ही जर अद्याप पी. एन. गाडगीळ आणि सन्स, ठाणे येथे भेट दिली नसेल, तर आजच या लक्झरी, परंपरा आणि उत्कृष्ट कारागिरीचा अनुभव घ्या आणि तुमच्या खास क्षणांना अधिक आनंददायी बनवा.

# कोकणाचा विकास आणि संस्कृतीचे जतन करण्यासाठी घेऊन येत आहोत - ग्लोबल कोकण महोत्सव २०२५!

मुंबई, ३ मार्च २०२५ - कोकणचा विकास म्हणजे फक्त मोठमोठे प्रकल्प नाहीत, तर आपली संस्कृती, आपली माणसं आणि आपला निसर्ग जपत पुढे जाण्याचा प्रवास आहे. हाच विचार पुढे नेण्यासाठी कोकण भूमी प्रतिष्ठान घेऊन येत आहे, ग्लोबल कोकण महोत्सव २०२५, ६ ते ९ मार्च दरम्यान नेस्को ग्राउंड, गोरेगाव (मुंबई) येथे हा भव्य सोहळा रंगणार आहे. ही कोकणच्या उज्वल भविष्यासाठी सुरू असलेली लोकचळवळ आहे! या कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षपदी रोजगार हमी योजना मंत्री मा. श्री भारत गोगावले असतील तर अध्यक्षपदी उद्योग मंत्री मा. श्री उदय सामंत असतील. तर महोत्सवाचे प्रमुख मार्गदर्शक महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान मंत्री मा. श्री आशिष शेलार, वनमंत्री मा. श्री गणेश नाईक आणि महाराष्ट्राचे खाण मंत्री मा. श्री शंभुराज देसाई असतील.





यंदा ग्लोबल कोकणच्या दशकपूर्तीनंतरचं हे ११वं वर्ष, आणि या निमित्ताने कोकणवासीयांसाठी माहितीपूर्ण सत्रं, उद्योजकांसाठी मार्गदर्शन, आणि नव्या संधींचं दार उघडणार आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजना, गुंतवणुकीच्या संधी, कोकणात स्टार्टअप्ससाठी नवे प्लॅटफॉर्म, कृषी आणि पर्यटन उद्योगातील नव्या कल्पना, शासकीय सवलती आणि सहकार्य याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करतील.

कोकण भूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष्य श्री संजय यादवराव म्हणाले' ''यावर्षी ग्लोबल कोकण महोत्सवातील सर्वात महत्त्वाचा विषय म्हणजे 'कोकण बिझनेस कॉन्क्लेव्ह'. या चार दिवसांमध्ये एक भव्य मार्गदर्शन सेमिनार सुरू करण्यात येणार आहे. या कक्षात शेती, पर्यटन, मासेमारी, प्रक्रिया उद्योग, स्टार्टअप्स आणि शासकीय योजनांवरील तज्ज्ञ मंडळी प्रत्यक्ष येऊन कोकणवासीयांना वैयक्तिक मार्गदर्शन करतील. याशिवाय, छोटे-छोटे वर्कशॉप्स आयोजित करण्यात येणार आहेत, जे कोकणातील तरुणांना आणि उद्योजकांना नव्या संधी शोधण्यास मदत करतील''.

महोत्सवाच्या केवळ चार दिवसांपुरते नव्हे, तर पुढील २५ वर्षे हे मिशन सुरू राहणार आहे. समृद्ध महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स आणि कोकण विकासाचे विविध क्लब यासंदर्भात प्रत्यक्ष काम करत आहेत. गावागावात हजारो प्रकल्प उभे राहून लाखो तरुणांना कोकणातच रोजगार उपलब्ध होणे हा या अभियानाचा संकल्प आहे.

दररोज संध्याकाळी ५ ते १० वाजेपर्यंत कोकणच्या रंगारंग लोकसंस्कृतीचा सोहळा रंगणार आहे! कोकणातील सर्वोत्तम दशावतार नाट्यप्रयोग, परदेशात झळकणारे पहिले नमन सादरीकरण, आदिवासी परंपरेचा अभिमान - तारपा नृत्य, पालखी नृत्य, जाखडी नृत्य, गौरी नाच, कोकणी कवी संमेलन - शब्दांमधून कोकणाचा आवाज! 'लाभले आम्हास भाग्य' - कौशल इनामदार यांचा लोकप्रिय कार्यक्रम पार पडेल. तसेच ८ मार्चला मराठी हिप-हॉपचे भन्नाट सादरीकरण होणार आहे.

कोकणचा अस्सल चवदार स्वाद घेण्यासाठी विशेष फूड फेस्टिव्हल आयोजित करण्यात आला आहे. यात मालवणी, आगरी, संगमेश्वरी, वाडवळ, सीकेपी, ब्राह्मणी अशा विविध खाद्यसंस्कृतींचे खास पदार्थ चाखायला मिळणार आहेत

**मुंबईत कमवायचं आणि कोकणात गुंतवायचं - हीच खरी स्मार्ट आयडिया!**

मुंबईत नोकरी-उद्योग करताना पर्यटन, शेती, बागायती, मासे प्रक्रिया, गृहनिर्माण आणि स्थानिक उत्पादन आधारित उद्योग कोकणात उभे करणं शक्य आहे. कोकणच्या विकासाची जबाबदारी प्रत्येकाने घ्यावी, कारण तुम्ही तुमची दिशा बदला, मगच कोकणाची दशा बदलेल!

आपलं कोकण म्हणजे केवळ गाव नाही, तर आपली ओळख आहे. ही संस्कृती, ही माती आपलीच आहे, मग ती सोडून जाणं योग्य का? कोकणात जमीन विकण्यापेक्षा ती विकसित करावी, बंद घरे सुरू करावीत, रिकाम्या शाळा पुन्हा गजबजून द्याव्यात, आणि स्थानिक अर्थव्यवस्था बळकट करावी.

याच उद्दिष्टाने शिवस्वराज्य लोक चळवळ आणि ग्लोबल कोकण अखंड कार्यरत आहेत. कोकणच्या मातीशी आपली नाळ जुळलेली प्रत्येकाने या महोत्सवात सहभागी होऊन या चळवळीला बळ द्यावं!



CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिवसैनिकांनी सदस्य नोंदणी करावी : प्रा. रवींद्र गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.३ मार्च -**
शिवसेनेचे मुख्य नेते तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशान्वये शिवसेना पक्षाच्या वतीने राबवण्यात येत असलेले शिवकार्य-शिवसेना सदस्य नोंदणी अभियाना संदर्भात शिवसेना मध्यवर्ती कार्यालय लोहारा येथे मा.खा.प्रा. रवींद्र गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत



तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली.
बैठकीत गायकवाड यांनी शिवसेना पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी तसेच तालुक्यातील प्रत्येक गाव खेड्यांतील कानाकोपऱ्यांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकवणे या उद्देशाने 'शिवकार्य शिवसेना' सदस्य नोंदणी अभियान राबवावे असे आवाहन केले. यावेळी या बैठकीस किरण गायकवाड, मोहन पणुरे, वैशाली खराडे, जगन पाटील, अमीन सुंबेकर, रितू गोरे, सर्व नगरसेवक, तालुका प्रमुख, विभागप्रमुख, गणप्रमुख, युवासेना, महीला आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### प्रवीण कोकणेंचा शिवसेनेच्या वतीने सत्कार

**तेरखेडा, दि.३ मार्च -**
वाशी तालुक्यातील जाणकापूर येथील सुपुत्र देश रक्षक भारतीय सैन्य दलाचे हवालदार या पदावर १६ वर्ष देशाची सेवा करून सेवानिवृत्त झाल्याबद्दल जानकापूर व पारगाव ग्रामस्थांच्या वतीने सेवानिवृत्त प्रवीण सखाराम कोकणे यांची जंगी मिरवणूक पारगाव व जानकापूर गावांमध्ये काढण्यात आली. यावेळी पारगाव व जाणकापूर येथे ठिकठिकाणी प्रवीण सखाराम कोकणे यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. यावेळी शिवसेना परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे विकास तळेकर, सविता विकास तळेकर, अंजली मोटे, समाधान मोटे, राजा कोळी, चेतन तातूडे, दीपक आखाडे, बाबासाहेब हारे, महेश कोकणे, अशोक जाधव, बाळासाहेब अहिरे आदी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व गावातील नागरिक उपस्थित होते.



### अनिकेत हुंबेचे परीक्षेत यश

**तुळजापूर, दि.३ मार्च -**
जवाहर नवोदय विद्यालय धाराशिवचा १२वीचा विद्यार्थी अनिकेत अंकुश हुंबे याने नोव्हेंबर २०२४ मध्ये दिल्लीतील इंटरनॅशनल ऑलिम्पियाड फाऊंडेशनद्वारे घेण्यात आलेल्या कॉम्प्युटर सायन्स ऑलिम्पियाड परीक्षेत पश्चिम विभागात पहिला क्रमांक पटकावला. प्राचार्य के.वाय. इंगळे यांच्या हस्ते यांच्या हस्ते चषक, पदक व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. अनिकेतला त्याचे संगणक शिक्षक यश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास क्रीडा अध्यापक आर.एम. अलसेट उपस्थित होते. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.



### भाविकांसाठी सिमेंट बाकडे भेट

**नळदुर्ग, दि.३ मार्च -**
नळदुर्ग येथील माजी सैनिक मानसिंह ठाकुर यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधुन आपल्या आईच्या स्मरणार्थ शहरातील अंबाबाई मंदिरात भाविकांना बसण्यासाठी सिमेंटचे बाकडे भेट दिले आहेत. त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे. आपल्या आईच्या स्मरणार्थ येथील अंबाबाई मंदिरात भाविकांना बसण्यासाठी सिमेंटचे बाकडे भेट दिले आहेत. यावेळी विनायक अहंकारी, दशरथसिंग ठाकुर, सरदारसिंग ठाकुर, दत्तात्रय वाघमारे, देवस्थान ट्रस्टचे सुरेश गायकवाड, राजेंद्र गोगाव, अंकुश जाधव आदिजण उपस्थित होते. यावेळी अंबाबाई देवस्थान ट्रस्टच्यावतीने ठाकुर यांचा सत्कार करण्यात आला.



### भाग्यश्री सुरवसे यांची पोलिस दलात निवड

**धाराशिव, दि.३ मार्च -**
उंबरेगव्हाण (ता. धाराशिव) येथील वारकरी कुटुंबातील कन्या भाग्यश्री सुरवसे यांनी कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर मुंबई पोलीस दलात स्थान मिळवले आहे. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते भाग्यश्री सुरवसे व त्यांच्या आई-वडिलांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, प्रा. भोसले, पर्यवेक्षक डोंगरे के.ए., प्राध्यापक, विद्यार्थी व इतर मान्यवर उपस्थित होते.

# हिंगळजवाडीत शेतकऱ्याचा खून

## संतप्त ग्रामस्थांचे रास्ता रोको आंदोलन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मार्च -**
धाराशिव तालुक्यातील हिंगळजवाडी येथे शेळ्या चोरण्याच्या प्रयत्नाला अडथळा ठरलेल्या शेतकऱ्याचा चोरट्यांनी दगडाने ठेचून निघृण खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे गावात संतापाची लाट उसळली असून, संतप्त ग्रामस्थांनी आज रास्ता रोको आंदोलन करत आरोपींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली.



याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मृत तानाजी भगवान मुळे (वय ६५, रा. हिंगळजवाडी) यांच्या शेतशेडमध्ये २ मार्चच्या मध्यरात्री काही अज्ञात चोरटे घुसले. त्यांनी शेळ्या चोरण्याचा प्रयत्न केला, मात्र शेळ्या ओरडू लागल्याने मुळे यांना जाग आली. त्यांनी चोरट्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता चोरट्यांनी त्यांच्यावर बेदम हल्ला केला. दगडाने त्यांच्या डोक्यावर वार करत त्यांचा जागीच खून केला. या अमानुष घटनेमुळे हिंगळजवाडीतील ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. आज (३ मार्च) सकाळी शेतकऱ्यांनी मुख्य रस्त्यावर उतरून रास्ता रोको आंदोलन केले. शेतकऱ्यांचा जीव



असुरक्षित आहे, पोलिस प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करत ग्रामस्थांनी घोषणा दिल्या. या प्रकरणी संजय राजेंद्र पवार, जितेंद्र प्रभू पवार (रा. तेर, धाराशिव), अमोल ईश्वर काळे आणि ईश्वर रामा काळे (रा. हिंगळजवाडी, धाराशिव) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सध्या फरार असून, त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथक तैनात करण्यात आले आहे.

या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपींना अटक करावी आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक हजारे करत आहेत.

## महात्मा फुले समता परिषदेच्या प्रदेश चिटणीसपदी स्नेहा सोनकाटे यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ मार्च -**
वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या तसेच ओबीसी नेत्या स्नेहा सोनकाटे यांची अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या प्रदेश चिटणीसपदी निवड करण्यात आली असुन त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातुन स्वागत होत आहे.
१ मार्च रोजी नाशिक येथील भुजबळ फार्म कार्यालयात अखिल भारतीय महात्मा फुले समता परीषदेच्या झालेल्या राज्य कार्यकारीणीच्या बैठकीत वंचित बहुजन आघाडीच्या, तसेच ओबीसी नेत्या सोनकाटे यांची अखिल भारतीय महात्मा फुले समता परीषदेच्या प्रदेश चिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते सोनकाटे यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे.

## शहरातील ६ बेकायदेशीर कत्तलखाने उध्वस्त करण्याची गोरक्षकांची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मार्च -**
धाराशिव शहरात मोठ्याप्रमाणात गोवंशाच्या रक्ताचे वाहणारे पाट थांबवावेत आणि आई तुळजाभवानीच पावित्र्य प्रशासनाने राखावे. यासाठी खिरणी मळ्यात नव्याने तयार झालेले बेकायदेशीर कत्तलखाने व पिंपरी गावातील बेकायदेशीर कत्तलखाने, हाडांचे कारखाने तातडीने उध्वस्त करण्यात यावेत. म्हणून जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना महाराष्ट्र शासनाचे मानद पशुकल्याण अधिकारी शिवशंकर स्वामी आणि गोरक्षक दिनेश धनके यांनी निवेदन देऊन तक्रार केली आहे.
यावेळी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांशी सकारात्मक चर्चा झाली.लवकरच योग्य कायदेशीर करू, असे आश्वासन त्यांना दोन्ही अधिकाऱ्यांनी दिले असल्याचे गोरक्षक दिनेश धनके यांनी सांगितले.

## महिलेवर लैंगिक अत्याचार; गुन्हा दाखल

**कळंब, दि.३ मार्च -** कळंब पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात ३७ वर्षीय महिलेवर गावातीलच ३५ वर्षीय तरुणाने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दि.२७ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १.३० ते २४ डिसेंबर २०२४ रोजी रात्री १० वाजेपर्यंतच्या काळात, महिला घरी एकटी असताना आरोपीने तिच्या एकटेपणाचा गैरफायदा घेतला. तसेच, फोनवरील संभाषणाची रेकॉर्डिंग व्हायरल करण्याची धमकी देत जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. पीडितेने १ मार्च २०२५ रोजी कळंब पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पानबुडी मोटर चोरीप्रकरणी आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मार्च -**
धाराशिव जिल्ह्यातील रामवाडी शिवारात झालेल्या पानबुडी मोटर चोरी प्रकरणाचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे. या प्रकरणी आरोपीला अटक करून एकूण ९ लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करत पोस्टे मुरुड (जि. लातूर) येथे कारवाई केली.



### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई...

या कारवाईत आरोपी आकाश पप्पू कसबे (रा. दत्तनगर, मुरुड, जि. लातूर) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून ०२ पानबुडी मोटर (किंमत ३५ हजार रुपये), चोरीसाठी वापरलेले चार चाकी वाहन (किंमत ८ लाख रुपये) आणि दुचाकी (किंमत ९० हजार रुपये) असा एकूण ९ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.
सदर गुन्ह्याची नोंद पोलीस ठाणे ढोकी येथे गु.र. नं. ७५/२०२५ भारतीय दंड संहिता कलम ३०३(२) अंतर्गत करण्यात आली आहे.
आरोपीसह मुद्देमाल ढोकी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे.
सदर कारवाई पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि. सुदर्शन कासार, पोह.शौकत पठाण, प्रकाश औताडे, जावेद काझी, फहरान पठाण, चालक रत्नदिप डोंगरे आणि नितीन भोसले यांच्या पथकाने केली.

## आलूर येथे महाशिवरात्रीनिमित्त गुरुपादेश्वर मंदिरात रथयात्रा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.३ मार्च -**
प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी आलूर येथे महाशिवरात्रीनिमित्त श्री. गुरुपादेश्वर मंदिराच्या परिसरात रथयात्रा संपन्न झाली. सुरुवातीला पुरवंतांच्या साक्षीने अग्नि प्रवेश कार्यक्रम झाला. त्यानंतर वेदमूर्ती महांतय्या स्वामी यांच्या हस्ते रथाची पुजा करुन रथ ओढण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.
संध्याकाळी प्रतीवर्षाप्रमाणे श्री. सोमेश्वर मंदिरात अनुभव मंटप आलूरच्यावतीने सामुहिक इष्टलिंग पुजा करण्यात आली. दि.२७ मार्च रोजी यात्रेनिमित्त जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. २,१०० रु.ची कुस्ती स्व. पांडुरंग दत्तात्रय पोतदार तर १,१११रु ची कुस्ती आलूरचे प्रथम माजी सैनिक कै. शिवणप्पा हणमंतप्पा शंके यांच्या स्मरणार्थ ठेवण्यात आली होती. धाराशिव, बादोला, अक्कलकोट, वागदरी, जामगा, कर्नाटकातील पैलवान कुस्त्या खेळण्यासाठी आले होते.
कार्यक्रम यशस्वीतेसाठी योगेश स्वामी, सागर उमशट्टे, प्रशांत काशेट्टी, मोनेश्वर सुतार, सिद्धप्पा पाटील तर कुस्ती स्पर्धा यशस्वी करण्यासाठी उपसरपंच जितेंद्र पोतदार, परमेश्वर मुळजे, संतोष भाकरे, सिद्धप्पा कुंचगे, आणप्पा बोळदे, सुरेश कुंचगे, निखिल पाटिल, युवराज हावळे, राम कुंचगे, अविनाश बोळदे, सतीश बोळदे आदींनी प्रयत्न केले.

# शेतकऱ्यांचे विविध प्रश्न आणि ड्रग्ज प्रकरणातील कारवाईसाठी काँग्रेसचा ट्रॅक्टर रॅली मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ मार्च -**
केंद्रातील व राज्यातील महायुती सरकारच्या विरोधात जिल्हा काँग्रेस कमिटीची ट्रॅक्टर रॅली मोर्चा आंदोलन दि.३ मार्च रोजी काढण्यात आला.
विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारने कर्जमाफी सारखे अनेक आश्वासन दिली. परंतु प्रत्यक्षात सत्तेत आल्यावर विसर पडलेला दिसत आहे.
शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करणार होते त्याचे काय झाले? मागेल त्याला सौर पंप अनेक शेतकऱ्यांनी नोंदी केल्या प्रत्यक्षात अजुन एकालाही मिळाला नाही. रोजगार हमी योजनाची कामे चालू कधी होणार ती तातडीने चालू करावीत. तुळजापूर, तमालवाडी ड्रग्स प्रकरणात सखोल चौकशी करून पकडलेल्या आरोपीचे सी.डी. आर. तपासून कारवाई करावी. ठिबक, तुषार सिंचन चे अनुदान अनेक वर्षापासून प्रलंबित आहे ते देण्यात यावे.
कृषी विभागा अंतर्गत अनुदानावर वाटप होणारे बी-बियाणे व औषधे हे ठेकेदारा मार्फत खरेदी न करता शेतकऱ्यांचा स्वतः खरेदी करण्याची परवानगी मिळावी.
महायुती सरकारच्या साक्षीने नंबरप्लेटच्या माध्यमातून इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वात जास्त म्हणजे तिप्पट पट वाढ करण्यात आलेली आहे. ती वाढ कमी करून वाहनधारकाना दिलासा देण्यात यावा.
अश्या अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत त्याकडे शासन दुर्लक्ष करत आहे. या कारणास्तव शेतकऱ्यामधे प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. सोमवार दि.३ मार्च पासून राज्य



शासनाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत आहे. या अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यात यावे या मागणीसाठी ट्रॅक्टर रॅली मोर्चा काढण्यात आला त्यानंतर तहसीलदारांना या सर्व मागणीची निवेदन देण्यात आले.
यावेळी काँग्रेसचे अमोल कुतवळ, धीरज पाटील, रणजीत इंगळे, भाऊ भांजी, यांच्यासह काँग्रेसचे सर्व पदाधिकारी, कार्यकत, सदस्य यांची उपस्थिती होती.

# हुतात्मा स्मारकातील बाबुंची झाडे वाळली; नळदुर्ग नगर पालिकेचे दुर्लक्ष!

**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.३ मार्च -**
नळदुर्ग नगरपालिकेच्यावतीने हुतात्मा स्मारकात लावण्यात आलेले बांबुची झाडे केवळ पाण्याअभावी वाळुन गेली आहेत. संपुर्ण शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या नगरपालिका प्रशासनाला हुतात्मा स्मारकातील झाडांना पाणी का देता आले नाही? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.
आज शासन झाडे लावा, झाडे जगवा यावर कोट्यावधी रुपये खर्च करत आहे. निसर्गाचा समतोल टिकवुन ठेवण्यासाठी वृक्ष लागवड करुन त्याची



जोपासना करणे ही आज काळाची गरज बनली आहे. कारण आज मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड झाल्यामुळे निसर्ग असंतुलित झाला आहे. त्यामुळे सरकारने वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. नळदुर्ग नगरपालिकेनेही शहरातील विविध भागात वृक्ष लागवड करुन वृक्ष जोपसण्याचे काम केले आहे. मात्र येथील हुतात्मा स्मारकात लावण्यात आलेली झाडे केवळ झाडांना पाणी मिळाले नाही म्हणुन झाडे वाळुन गेली आहेत. ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे.
हुतात्मा स्मारकात प्रवेशद्वार ते स्मारकातील हुतात्मा स्तंभा पर्यंत नगरपालिकेच्यावतीने बांबुची झाडे लावण्यात आली आहेत. ही बांबुची झाडे अतिशय चांगल्या प्रकारे आल्याने हुतात्मा स्मारकात प्रवेश केल्यानंतर ती हिरवीगार बांबुची झाडे पहिल्यानंतर मन प्रसन्न होत होते. मात्र सध्या केवळ या झाडांना पाणी मिळाले नाही म्हणुन ही बांबुची झाडे वाळुन गेली आहेत. नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी या प्रकरणी तात्काळ लक्ष घालुन हुतात्मा स्मारकातील झाडांना पाणी कसे उपलब्ध करून देता येईल हे पाहण्याची गरज आहे. हुतात्मा स्मारकापासुन थोड्याच अंतरावर राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात नगरपालिकेची बोअर असुन या बोरअला मुबलक पाणी आहे. हे पाणी जलवाहिनीद्वारे हुतात्मा स्मारकात पोहचवुन तेथील झाडांना देता येऊ शकते.

### झाडांना पाणी देण्याची वृक्षप्रेमीची मागणी...

जी नगरपालिका संपुर्ण गावाला पाणीपुरवठा करते त्या नगरपालिका प्रशासनाला हुतात्मा स्मारकातील झाडांना पाणीपुरवठा का करता येत नाही असा प्रश्न नागरीकांमधुन विचारला जात आहे. आजही या बांबुच्या झाडांना पाणी मिळाले तर ते पुन्हा पुर्वीसारखे हिरवीगार होण्याची शक्यता आहे.

CMYK

लातूर
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासंर्दभात उपजिल्हाधिकारी यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३ मार्च -**
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षातर्फे शेतकऱ्यांच्या विवीध मागण्यासंर्दभात निलंगा, शिरुर अनंतपाळ, देवणी तालुक्यातील जनतेच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

शेतकऱ्यांना २४ तास वीजपुरवठा सुरळीत करावा, पीक विमा रक्कम खात्यात तात्काळ जमा करावे, अतिवृष्ठीच्या शिल्लक शेतकऱ्यांचे अनुदान त्वरीत जमा करणे, कर्जमाफी तात्काळ लागु करावी, कृषि अवजारे व खत बी-बियाणे वरील जीएसटी रद्द करावी, आदी मागण्या केल्या आहेत. वरील सर्व मागण्या शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी शासनाने त्वरीत मंजुर करव्या अन्यथा चक्का जाम आंदोलन करण्यात येईल.

यावेळी जि.प.सदस्य. सुरेंद्र धुमाळ, सुधीर लखनगावे, सरपंच रमेश मोगरगे, सोनाजी कदम, दिनकर निटुरे, अनिल अग्रवाल, सुर्यवंशी व्यंकट, जब्बार अली, दिलीप हुलसुरे, गोविंद पाटील, किरण मगर, सुभाष पाटील, दिनकर पाटील, शिवाजी पाटील, भगवान जाधव, दिलीप बिरादार, भदरगे अशोक, शेख महंमद, बिराजदार भागवत यांच्यासह काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थीत होते.



## संक्षिप्त वृत्त...

### सचिन पाटील यांना पुरस्कार जाहीर


**निलंगा, दि.३ मार्च -**
तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील चित्रकला विभागातील



सेवानिवृत्त प्राध्यापक तथा सुप्रसिद्ध कथा-कादंबरीकार सुरेन्द्र रावसाहेब पाटील यांनी साहित्यक्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या वाचन चळवळ व भाषा वृद्धीसाठी सातत्याने धडपडणाऱ्या लेखक व व्यक्ती यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी वडिलांच्या नावाने रावसाहेब पाटील साहित्य पुरस्कार देण्याचे ठरवले असून पहिला पुरस्कार सांगली जिल्ह्यातील कर्नाळ येथील सचिन वसंत पाटील यांनी संपादित केलेल्या 'मायबोली रंग कथांचे' या पुस्तकास जाहीर केला आहे. रोख ५००० रुपये, मानचिन्ह, ग्रंथ व शाल असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. कथाकार सचिन पाटील यांनी २२ बोली भाषेतील कथा या पुस्तकात संपादित केल्या आहेत. दि.२७ फेब्रुवारी रोजी प्रा. सुरेन्द्र पाटील यांनी सदर पुरस्काराची घोषणा केली आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सचिन पाटील यांच्यावर साहित्य क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### दोन चिमुकल्यांचा पहिला रोजा पूर्ण

**वलांडी, दि.३ मार्च -**
देवणी तालुक्यातील वलांडी येथील उस्मानिया मस्जिदचे मौलवी इब्राहिम हाफिज यांचे चिमुकले ८



वर्षांची अदेबा इब्राहिम शेख आणि ६ वर्षांचा माज इब्राहिम शेख या बहीण-भावाने रमजान महिन्यातील आपला पहिला रोजा पूर्ण केला. त्यांच्या या श्रद्धा व समर्पणामुळे संपूर्ण गावात त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. रमजानचा पवित्र महिना २ मार्चपासून सुरू झाला आहे. सध्या उन्हाळ्याच्या कडाक्यातही या लहानग्यांनी समर्पित भावनेने पहिला रोजा पूर्ण केल्याने गावातील मुस्लिम बांधवांनी त्यांचा पुष्पहार घालून सत्कार केला आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

### विजयकुमार भालके यांचे निधन

**अहमदपूर, दि.३ मार्च -**



येथील ज्येष्ठ दस्त लेखक विजयकुमार विश्वनाथप्पा भालके यांचे वृद्धापकाळाने दि.१ मार्च रोजी वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सूना, नातवंडे, परतवंडे असा मोठा परिवार असून दस्त लेखक पप्पू उर्फ काशिनाथ भालके यांचे ते वडील होत.

### युवक-युवती नेतृत्व विकास शिबिराचे आयोजन

**उदगीर, दि.३ मार्च -**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने 'जिल्हास्तरीय विशेष युवक-युवती नेतृत्व विकास शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर ६ ते १० मार्च या कालावधीत महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या परिसरात संपन्न होणार आहे. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी आपल्या विद्यार्थ्यांना या शिबिरासाठी पाठवून सुवर्णसंधी उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. के. मस्के आणि उपप्राचार्य डॉ. एस. जी. पाटील यांनी केले आहे.

# धवेलीत अंत्यविधीवरून पुन्हा वाद; महिलांनीच पुढाकार घेत रचले सरण

**सरणावर चढून शेतकऱ्याने विरोध केला... प्रशासनाने घेतली मध्यस्थितीची भूमिका...**

**उदयकुमार पाठक**
**रेणापूर, दि.३ मार्च -**
धवेली (ता. रेणापूर) येथील शेतकऱ्य आणि मयताच्या नातेवाईकांमध्ये वादाची एक गंभीर घटना घडली आहे. मागासवर्गीय समाजाच्या स्मशानभूमीच्या जागेवरून उभ्या असलेल्या वादामुळे धवेली येथे पुन्हा एकदा गोंधळ उडाला. मागील वीस दिवसांपूर्वी, एका मयत व्यक्तीवर २४ तासांनी अंत्यविधी केले गेले होते, आणि शनिवारी (दि. १) रात्री एक ७० वर्षीय महिलेच्या निधनानंतर पुन्हा त्याच स्मशानभूमीवर शेतकऱ्याने अंत्यविधी रोखण्याचा प्रयत्न केला.

स्मशानभूमीवरील जागेच्या मालकीच्या वादामुळे, शेतकऱ्याने या जागेवर अंत्यविधी होऊ देणार नाही, असे स्पष्ट केले. या वादात मयताच्या नातेवाईकांनी आक्रमकता दाखवत, उपजिल्हाधिकाऱ्यांचा आदेश दाखवित शेतकऱ्याला पोलीसांच्या मदतीने बाजूला केले आणि अंत्यविधी पार पाडले.

सविस्तर माहिती अशी की, धवेली येथील सर्वे नं. ६३ मधील गट क्रमांक २५४ मधील स्मशानभूमीच्या जागेवर वंशपरंपरेने मृतांच्या अंत्यसंस्कारांची प्रथा आहे. मात्र, संबंधित शेतकऱ्याने या गटात अंत्यविधी होत नाहीत, असे सांगत या प्रकरणी रेणापूर तहसील कार्यालयात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर नायब तहसिलदारांनी शेतकऱ्याच्या बाजूने ७/१२ नोंदीवर मसनवाटा कमी करण्याचे आदेश दिले होते. या निर्णयाच्या विरोधात उपविभागीय अधिकारी औसा रेणापूर यांच्याकडे अपील करण्यात आले होते, ज्यावर कार्यवाही सुरू होती. शनिवारी, ८ फेब्रुवारी रोजी ७० वर्षीय अनुसयाबाई गुंडाजी वाघमारे यांच्या निधनानंतर, नातेवाईक आणि ग्रामस्थ स्मशानभूमीवर जाऊन अंत्यविधीसाठी तयारी करत असताना, शेतकऱ्याने पुनः त्यावर विरोध केला. त्यानंतर प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले. उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार मंजुषा भगत,



गटविकास अधिकारी सुमित जाधव, सहायक गटविकास अधिकारी सतीश पाटील, पोलीस उपनिरीक्षक घाडगे आणि इतर अधिकारी कर्मचार्यांनी हस्तक्षेप करून शेतकऱ्याला आश्वासन दिले आणि अखेर २४ तासांनंतर अंत्यविधी पार पडला. याच घटना न संपता, २ मार्च रोजी शेतकऱ्याने पुन्हा विरोध केला, आणि अंत्यविधी करणार्या नातेवाईकांना रचलेल्या सरणावर उभा राहून ते रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी, मयताच्या नातेवाईकांनी पोलीसांच्या मदतीने शेतकऱ्याला बाजूला करत सरण तयार करून अंत्यविधी पार पाडला.

या घटनेची माहिती मिळताच चाकुर पोलीसांनी शेतकऱ्याला ताब्यात घेतले. प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, येणाऱ्या काळात या स्मशानभूमीच्या जागेवरील वादावर अंतिम निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

## मागील पाच वर्षाच्या कार्यकाळात आपला लोकसेवक म्हणून काम केले : आमदार संजय बनसोडे



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ मार्च -**
सन २०१४ पासून मी मतदार संघातील जनतेच्या सेवेत अविरतपणे असल्यानेच मागील २०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीत मला पहिल्यांदा आमदार होण्याची संधी आपण सर्वांनी दिली व आपल्या मताचा आदर करुन पक्षश्रेष्ठींनी मंत्री पदाची जबाबदारी दिल्याने मागील पाच वर्षाच्या कार्यकाळात सहा हजार कोटींपेक्षा जास्त विकास निधी खेचुन आणुन मागील कार्यकाळात आपला लोकसेवक म्हणून काम केले असल्याचे मत माजी क्रीडा मंत्री आ. संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

उदगीर तालुक्यातील हेर ग्राम स्थांच्या वतीने आयोजीत भव्य नागरी सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी माजी आ. गोविंद केंद्रे, रामचंद्र तिरुके, बाबासाहेब पाटील, भागवत गुरमे, बालाजी भोसले, वसंत पाटील, रजनीस रासुरे, हणमंतराव हंडरगुळे, लक्ष्मण जाधव, लक्ष्मण गुराळे, बालाजी पुरी, अनंत पाटील, धनाजी माटेकर, गणपती मुंडे, सुदर्शन मुंडे, मारोतीराव घोणसे, विलास कांबळे, मारोतीराव घोणसे, सुधाकर बिरादार, केशव कांबळे, भगवंत मिटकरी, दत्ता बुरले, गंगाधर स्वामी, गुरपत मळभागे, रवी रासुरे, सोयराबाई कांबळे, माधव मिटकरी, तानाजी मुंडे, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ. बनसोडे यांनी, मागच्या काळात केलेल्या विकास निधीमुळेच मतदार संघाच्या चेहरा मोहरा बदलण्याचे काम केल्याने २०२४ च्या निवडणुकीत आपण सर्वांनी ९३ हजाराचे मताधिक्य देवून मला दुस-यांदा आमदार केले. आता आणखीन काम करण्याची जबाबदारी वाढली असुन मी कधीही आमदारकी आणि मंत्री पदाचा गर्व केला नाही. जनतेचा जनसेवक समजुन जनतेच्या सेवेत सदैव उपलब्ध आहे. मी माझ्या ३२ वर्षाच्या राजकीय व सामाजिक जीवनात काम करत असताना मी चळवळीतुन घडलेला कार्यकर्ता असल्याने मला सर्वसामान्यांचे दु:ख समजते. आता एम.एच. ५५ ही उदगीरकरांची महाराष्ट्रात नवी ओळख दिली आहे असल्याचे सांगितले.

यावेळी हेर गावातील नागरीक व महिला उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांची फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स, चाकण येथे निवड

**उदगीर, दि.३ मार्च -**
येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील एचएसव्हीसी विभागातील इयत्ता १२ वी इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांची प्रतिष्ठित फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स, चाकण (एम आयडीसी, पुणे) येथे प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.

यामध्ये गणेश बनसोडे, रुपेश पांडे, सोहेल इकबाल शेख, अथर्व सोनकांबळे, अनिकेत वाहुळे, गोविंद सूर्यवंशी, प्रशांत सूर्यवंशी, गणेश जलंगे, शिवशंकर कुंभार आणि रेखा केदासे यांचा समावेश आहे. फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स ही भारतातील नावाजलेली कंपनी असून ती विमान, रेल्वे, चारचाकी, दुचाकी तसेच विविध वाहनांसाठी इंडिकेटर आणि अन्य अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणे तयार करते.

यशाबद्दल सर्व निवड झालेल्या मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, ॲड.एस.टी.पाटील चिघळीकर, डॉ. रामप्रसाद लखोटिया, भालचंद्र चाकूरकर, प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, डॉ.एस.जी. पाटील, प्रा.जी. एस. पाटील तसेच सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले.

## अंगणवाडी केंद्र रुद्धा येथे जागतिक कडधान्य दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३ मार्च -**
अहमदपूर तालुक्यातील जि.प. शाळा रुद्धा येथील अंगणवाडी केंद्राच्या वतीने दि.३ मार्च रोजी जागतिक कडधान्य दिन साजरा करण्यात आला. या दिवशी कडधान्याचे महत्त्व शालेय विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यासाठी विविध प्रकारचे कडधान्ये, पालेभाज्या, फळभाज्या, रानमेवा भाज्या आणि लहान मुलांसाठी खेळणी आणि माहिती देणारे फलक शाळेत मांडण्यात आले.

यावेळी राठोड (पं.स. अहमदपूर) यांनी निरीक्षक म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षतेखाली साके (मुख्याध्यापिका) यांची उपस्थिती होती. तसेच प्रमुख उपस्थित म्हणून नाथराव केंद्रे (उपसरपंच), डॉ. नाईक (आरोग्य उपकेंद्र अधिकारी), डॉ. धुळे (आरोग्य उपकेंद्र), डॉ. मंद्देवाड (आरोग्य उपकेंद्र), शिल्पा चंदेवाड (शालेय समिती उपाध्यक्षा) उपस्थित होते. कार्यक्रमात जि.प.प्रा. शाळेतील सह शिक्षक माने, नाईनवाड तसेच जि.प.प्रा. शाळेचे कर्मचारी देउ चित्तलवाड, आशा कार्यकर्ती जयश्री केंद्रे, सुवर्णा केंद्रे, सतिश केंद्रे, अंगणवाडी मदतनीस महादिका सुरणर यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अखेरीस सर्व मान्यवरांचा व ग्रा.पं.कर्मचारी, जि.प. शाळेचे कर्मचारी, अंगणवाडी सेविका ज्योती बदने यांनी भेटवस्तू देऊन सन्मान केला.

## मुख्य निवडणूक आयुक्तांची वादग्रस्त नियुक्ती; लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ मार्च -**
नुकतेच निवृत्त झालेले भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यावर निवडणूक प्रक्रियेत हेराफेरी केल्याचे गंभीर आरोप झाल्यानंतरही केंद्र सरकारने विरोधकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून ज्ञानेश कुमार यांची नवीन मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती केली आहे. यामुळे भारतीय लोकशाहीच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विरोधी पक्षांनी या नियुक्तीवर जोरदार आक्षेप घेतला असून, पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेसाठी नव्या नियुक्ती पद्धतीची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर 'फूक' संघटनेने राष्ट्रपतींना निवेदन देत मुख्य निवडणूक आयुक्त आणि मुख्य न्यायाधीश यांच्या निवड प्रक्रिया सुधारण्यासाठी एक सर्वसमावेशक, स्वतंत्र आणि पारदर्शी पद्धतीचा अवलंब करण्याची



मागणी केली आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, निवडणूक आयोग आणि न्यायव्यवस्थेवर लोकांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी या पदांवरील नियुक्ती कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाशिवाय पार पाडली पाहिजे. सध्याच्या नियुक्ती प्रक्रियेमुळे भारतीय लोकशाहीची प्रतिमा मळवली जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरही या घटनाक्रमाची नोंद घेतली जात असून, भारतातील लोकशाही प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह राहील का, याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. आता केंद्र सरकार विरोधकांच्या आणि नागरी संस्थांच्या या मागण्यांकडे कितपत लक्ष देते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

निवेदनावर अध्यक्ष धर्मवीर कदम, उपाध्यक्ष रमेश बाराते, सचिव गणेश वाघमारे, भा.न. शेळके यांच्यासह आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## एस.टी. कामगार संघटनेच्या अध्यक्षपदी राजकुमार सूर्यवंशी

### सचिवपदी अंकुश काळे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३ मार्च -**
निलंगा आगारच्या एस टी कामगार संघटनेच्या अध्यक्षपदी राजकुमार सूर्यवंशी तर सचिवपदी अंकुश काळे यांची निवड करण्यात आली आहे.

तालुक्यातील बाकली येथील रहिवासी राजकुमार सुर्यवंशी हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ निलंगा आगारात कंडाक्टर या पदावर कार्यरत आहेत. महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत राजकुमार सुर्यवंशी यांची एक मताने निवड करण्यात आली.

या सभेसाठी विभागीय कार्यकारणी सदस्य व कामगार संघटना सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती. या सभेत निलंगा आगार कामगार संघटनेचे अध्यक्ष म्हणून राजकुमार सूर्यवंशी तर आगार सचिव म्हणून अंकुश काळे यांची एकमतानी निवड करून शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी विभागीय सदस्य शाम येरावाड, प्रकाश शनिमे, खंडू धुमाळ उपस्थित होते.



सदर सभेसाठी उद्धव गौडगावे, हणमंत पाटील, सांडूर उमेश, अनिल बिराजदार, प्रल्हाद विठूबोयाने, संतोष गायकवाड, दयानंद मलशेट्टे, बसवराज स्वामी, गोविंद कन्हेरे, भगवान राजे, दयानंद बडगे, सुधाकर वडमिले, देवा बेंडले, प्रवीण बेंडले, राजा कांबळे, राम मारापल्ले, भोजने जनार्धन, राम शिरूरे, चंदू शिंदे, गणेश थेट्टे, दिलीप येडले, पांडुरंग सुरशीट्टे, दत्ता शिंदे, वाडीकर सुधाकर सह कामगार संघटनेचेचे सभासद उपस्थित होते.

## बहुगुणी पळस बहरला; वसंत ऋतूत निसर्गाचा रंगोत्सव

**तभा वृत्तसेवा / शंकर मिटकर**
**शिरूर अनंतपाळ, दि.३ मार्च -**
शिरूर अनंतपाळ तालुक्यात सध्या पळसाच्या झाडांनी मोठ्या प्रमाणात बहर घेतला आहे. फ्लेम आफ द फायर असे इंग्रजांनी ज्याचे वर्णन केले आहे, तो पळस आजकल चोहीकडे लाल, केशरी, भगवा आणि किंचित पांढऱ्या रंगाच्या फुलांनी नटलेला दिसत आहे. या झाडाच्या भव्य बहरामुळे ते स्थानिक आणि पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे.

वसंत ऋतूच्या आगमनासोबतच शिशिराची थंडी ओसरून, वृक्षांची पानगळी झाल्यानंतर पळसाची पिवळी-लाल फुलं फुलतात, आणि त्याच्या गंधाने वातावरण सजले जाते. पळसाला पाने तीन अशी प्रसिद्ध म्हण असली तरी या झाडाच्या फुलांचा महत्त्वही मोठा आहे. संस्कृतमध्ये पलाश या शब्दाचा अर्थ फुलांनी बहरलेले झाड असा दिला जातो. शारीरिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून पळसाची फुले सरस्वती माता आणि कालीका मातेस अर्पण केली जातात.

पळसाची फुले आणि पाने पूर्वी मोठ्या प्रमाणावर पंगतीच्या जेवणासाठी द्रोण आणि पात्र म्हणून वापरली जात होती. कालानंतर तरीही पळसाच्या झाडाला महत्त्व टिकून आहे. या वृक्षाची उंची जास्त नसली तरी त्याचा आकार आणि रंग निसर्गात एक सुंदर रंगोत्सव निर्माण करतात. पळसाची पांढरी, केशरी, लाल, भगवी फुले एकत्र येऊन झाडाच्या प्रत्येक फांदीवर विस्तवाच्या गोळ्यासारखी दिसतात.

पळसाच्या फुलांचा वापर धुलीवंदन सणासाठी रंग तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. आयुर्वेदिक औषधी वनस्पती म्हणूनही पळसाला महत्त्व आहे. पळसाच्या फुलांपासून तयार केलेल्या पाण्याने अंघोळ केली तर त्वचा रोग नाहीसे होतात, असे आयुर्वेद सांगतो. याचे बियाणे देखील औषध म्हणून वापरले जातात.

सध्या शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शेतशिवारात पळसाच्या बहरलेल्या झाडांच्या मनमोहक दृश्याने निसर्गप्रेमी आणि पर्यटकांना खूप आकर्षित केले आहे. पळसाच्या बहुगुणीतेमुळे या झाडाला आयुर्वेदात विशेष स्थान दिले गेले आहे आणि ते निसर्गाच्या रंगोत्सवाला जिवंत ठेवण्याचे काम करत आहे.



## जागतिक महिला दिनानिमित्त आज एकल महिला मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३ मार्च -**
अहमदपूर उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि तहसील कार्यालय अहमदपूर यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त एकल महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

पतीच्या मृत्युनंतर मुलांच्या पालन पोषणासह संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी घेत, प्रतिकूल परिस्थितीतही हिम्मत न हारता कौटुंबिक जबाबदारी यशस्वीपणे सांभाळणाऱ्या महिलांच्या मनोबलाला प्रोत्साहन देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाद्वारे एकल महिलांना विविध सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्याचा उद्देश आहे. महिलांना योग्य माहिती न मिळाल्यामुळे अनेक योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचलेला नाही.

या कार्यक्रमात तहसील प्रशासन, पोलीस प्रशासन, पंचायत समिती, कृषी विभाग आणि अन्य विभाग सहभागी होणार आहेत. यावेळी संबंधित विभाग महिलांना त्या योजनांचा लाभ कसा घेता येईल याबाबत मार्गदर्शन करतील. सदर कार्यक्रम पार्वती मंगल कार्यालय, थोडगा रोड, अहमदपूर येथे दि.४ मार्च रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षतेखाली वर्षा ठाकूर घुगे, जिल्हाधिकारी, लातूर असतील.

कार्यक्रमाला अधिकाधिक एकल महिलांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक डॉ. मंजुषा लटपटे, उज्वला पांगरकर, तहसीलदार अहमदपूर यांनी केले आहे.

अग्रलेख...

# आता केरळ आणि पश्चिम बंगालकडे रोख!

२७ वर्षांनंतर दिल्लीमध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर आता भाजपा केरळ आणि पश्चिम बंगालवर अधिक लक्ष केंद्रित करेल, यात शंका नाही. भारतीय जनता पक्षाला केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये सत्ता स्थापन करता आलेली नाही. या दोन्ही राज्यांमध्ये डाव्या आणि प्रादेशिक पक्षांचा मोठा प्रभाव आहे, त्यामुळे भाजपा आतापर्यंत सत्तेत येऊ शकलेली नाही. दिल्लीमध्ये काँग्रेस आणि आम आदमी पक्षाची सरकारे बऱ्याच काळापासून स्थापन झाली होती. १९९८ पासून भाजप येथे सत्तेत येऊ शकला नव्हता; परंतु 'आप'चे संयोजक अरविंद केजरीवाल यांची घसरणारी लोकप्रियता आणि मोदी यांच्या नेतृत्वाखालील निवडणूक रणनीतीमुळे भाजपला विजय मिळाला. आता केरळ आणि बंगालबद्दलही हाच प्रश्न उपस्थित केला जात आहे. दिल्लीमध्ये मिळालेल्या यशाची पुनरावृत्ती भाजप केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये करू शकेल का, असा प्रश्न आता चर्चेत आहे. केरळमधील राजकारण प्रामुख्याने डावी लोकशाही आघाडी (एलडीएफ) आणि संयुक्त लोकशाही आघाडी (यूडीएफ) यांच्यात फिरत राहिले आहे. 'एलडीएफ'वर प्रामुख्याने सीपीआयएमचे वर्चस्व राहिले आहे, तर काँग्रेस हा 'यूडीएफ'मधील मुख्य पक्ष राहिला आहे. भाजपने येथे आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न केला; परंतु यात भाजपला यश आले नाही. २०१६ मध्ये भाजपचा पहिला आमदार जिंकला; परंतु २०२१ च्या निवडणुकीत पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही भाजपला फारसा फायदा झाला नाही; परंतु काँग्रेस आणि डाव्यांमधील वाढत्या मतभेदांचा फायदा भाजपला नजीकच्या भविष्यकाळात होऊ शकतो. भाजपने अलिकडेच केरळमध्ये ख्रिश्चन समुदायात हातपाय पसरण्यास सुरुवात केली आहे. भाजपने मुस्लिम आणि ख्रिश्चन मतांमध्ये प्रवेश केला, तर त्यांना केरळमध्ये आघाडी मिळू शकते. सर्वांत मोठे आव्हान म्हणजे केरळमध्ये भाजपची मूळ मतपेढी अद्याप मजबूत नाही. पश्चिम बंगालमध्ये डाव्या आघाडीने (सीपीआय-एम) अनेक दशके राज्य केले. तिथे २०११ पासून तृणमूल काँग्रेस सत्तेमध्ये आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने चमकदार कामगिरी केली आणि १८ जागा जिंकल्या. यावरून राज्यात त्यांची पकड मजबूत होत असल्याचे दिसून येते; परंतु २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत 'टीएमसी'ने २१३ जागा जिंकल्या आणि सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन केले तर भाजपला ७७ जागांवर समाधान मानावे लागले. पश्चिम बंगालमध्ये भाजप मुख्य विरोधी पक्ष म्हणून उदयास आला असला, तरी अद्याप कधी राज्यात सरकार स्थापन केलेले नाही. तृणमूल काँग्रेसवरील भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांचे आरोप भाजपसाठी एक मोठा मुद्दा बनू शकतात. पश्चिम बंगालमध्ये हिंदुत्वाचे राजकारण आणि एनआरसी-सीएएसारखे मुद्दे भाजपच्या बाजूने जाऊ शकतात. भाजप बंगालमध्ये एक मजबूत संघटना उभारण्यात यशस्वी झाला आणि ममता बॅनर्जी यांच्या पक्षात अंतर्गत कलह निर्माण झाला, तर पुढची निवडणूक कठीण असू शकते. मात्र या राज्यातले सर्वांत मोठे आव्हान म्हणजे तृणमूल काँग्रेसची मतपेढी अजूनही मजबूत आहे. बॅनर्जी यांची प्रतिमा बंगालमध्ये खूप प्रभावी आहे. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांची रणनीती नेहमीच दीर्घकालीन राजकारणावर केंद्रित राहिली आहे. तिथे ते हळूहळू आपले बळ वाढवतात आणि नंतर सत्तेपर्यंत पोहोचतात. दिल्लीत २७ वर्षांनी भाजपचे सरकार स्थापन होत आहे. त्यामुळे केरळ आणि पश्चिम बंगालमध्येही पक्ष आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल. दोन्ही राज्यांची राजकीय परिस्थिती वेगळी असली, तरी भाजपने योग्य रणनीती अवलंबल्यास येत्या काळात पश्चिम बंगाल आणि केरळमध्ये सत्ता परिवर्तन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. १९९१ मध्ये दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा मिळाला आणि १९९३ मध्ये पहिल्यांदाच दिल्ली विधानसभेच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकीमध्ये भाजपने ४९ जागा जिंकून बहुमत मिळवले आणि मदनलाल खुराणा दिल्लीचे पहिले मुख्यमंत्री बनले; परंतु काही राजकीय कारणांमुळे त्यांना १९९६ मध्ये राजीनामा द्यावा लागला. खुराणा यांच्या राजीनाम्यानंतर साहिबसह वर्मा यांना मुख्यमंत्री करण्यात आले. १९९८ मध्ये दिल्लीत वाढती महागाई आणि कांद्याच्या किमतींबद्दल जनतेत रोष निर्माण झाला होता. त्यामुळे वर्मा यांना बाजूला करून विधानसभा निवडणुकीच्या काही काळापूर्वी सुषमा स्वराज यांना मुख्यमंत्री बनवण्यात आले; परंतु या निर्णयाचा निवडणूक निकालांवर परिणाम होऊ शकला नाही. १९९८ च्या निवडणुकीमध्ये काँग्रेसने प्रचंड विजय मिळवला आणि शीला दीक्षित मुख्यमंत्री झाल्या. त्या वेळी कांद्याचे वाढते दर आणि इतर काही निर्णय भाजपच्या विरोधात गेले. त्यामुळे पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले. दीक्षित यांनी सलग तीन वेळा (१९९८, २००३, २००८) दिल्लीमध्ये सरकार स्थापन केले आणि १५ वर्षे राज्य केले. त्यानंतर २०१३ मध्ये आम आदमी पक्षाचे सरकार स्थापन झाले. २०१५ आणि २०२० मध्ये केजरीवाल बहुमताने विजयी झाले. १९९८ पासून भाजप दिल्लीत पुन्हा सत्तेत आला नव्हता.

तथापि, दिल्ली महानगरपालिका निवडणुकीत भाजपने आपले मजबूत अस्तित्व कायम ठेवले आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल नेहमीच राष्ट्रीय राजकारणावर परिणाम करतात आणि या वेळीही त्याचा बिहार विधानसभा निवडणुकीवर परिणाम होऊ शकतो. बिहारचे राजकारण आणि दिल्लीचे राजकारण निश्चितच वेगळे आहे; परंतु या दोन राज्यांना जोडणारे अनेक घटक आहेत. बिहारमधील लोक दिल्लीत मोठ्या संख्येने राहतात. दिल्लीमध्ये भाजप ज्या पद्धतीने विजय मिळवत आहे, त्यावरून हे स्पष्ट होते की त्यात बिहारी लोकांचीही बरीच मते आहेत. दिल्लीच्या विजयाचा बिहारमध्ये निश्चितच परिणाम होऊ शकतो. भाजपने दिल्लीमध्ये सरकार स्थापन केले आहे. त्यामुळे बिहारमध्येही भाजपची स्थिती मजबूत होऊ शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. दिल्लीमध्ये काँग्रेस पक्ष अडचणीमध्ये आहे. सलग तिसऱ्या निवडणुकीत काँग्रेसला येथे एकही जागा जिंकता आली नाही. काँग्रेसने शहाणपणाने निर्णय घेतले नाहीत, तर बिहारमध्येही पक्षाला मोठे नुकसान सहन करावे लागू शकते. बिहारमध्ये जात सर्वेक्षण करणे हे लालू यादव यांचे स्वप्न आहे. ते बऱ्याच काळापासून याची मागणी करत होते. तेजस्वी यादव यांनीही तो मुद्दा बनवला आणि नंतर ते पूर्ण झाले; पण जेव्हा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी दोनदा बिहारला गेले, तेव्हा दोन्ही वेळा त्यांनी जात जनगणनेचा अहवाल 'बनावट' असल्याचे म्हटले. काँग्रेस पक्षाला आता हे समजून घ्यावे लागेल की ते स्वतःहून काहीही करू शकत नाहीत, त्यांना मित्रपक्षांची गरज आहे. तथापि, भाजपदेखील बिहारमध्ये एकटा काहीही करू शकत नाही. नितीशकुमारदेखील याचा फायदा घेतात. काँग्रेसने धडा घेतला नाही, तर बिहारचेही भवितव्य असेच घडू शकते. असे असले तरी आगामी बिहार निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्ष महाआघाडीसोबत राहण्याची शक्यता जास्त आहे. दिल्ली, हरयाणा आणि महाराष्ट्र या तीन राज्यांमधील पराभवाचा परिणाम बिहारमध्येही दिसून येईल. बिहार विधानसभेच्या निवडणुका एप्रिल-मेमध्ये होण्याची शक्यता आहे. होळीनंतर निवडणूक आयोगाचे पथक बिहारला भेट देऊ शकते. म्हणजेच पथक तयारीचा आढावा घेईल, जेणेकरून एप्रिल-मे पर्यंत निवडणुका घेता येतील. नितीशकुमार आता पक्ष बदलणार नाहीत. ही त्यांची शेवटची पाळी आहे, कारण आता परिस्थिती बदलली आहे. पुन्हा पक्ष बदलल्यास नितीश यांची राजकीय शक्ती कमी होईल. दुसरे म्हणजे संयुक्त जनता दलाच्या बारा खासदारांपैकी बहुतेकजण भाजपच्या विचारधारेचे आहेत. या १२ खासदारांपैकी कोणीही पक्ष बदलण्याचा विचार केल्यास संयुक्त जनता दल पूर्णपणे तुटून पडेल. प्रथम पक्ष संसदेत फुटेल आणि नंतर बिहारमध्ये फुटेल. राष्ट्र आणि हिंदुत्वाचे मुद्दे दोन्ही राज्यांच्या राजकारणाला एकमेकांशी जोडतात. मोदी यांनी दिलेला 'एक है तो सेफ है' हा कानमंत्र आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणांचा प्रभाव बिहारमध्येही दिसून येतो. मोदी यांचा दिल्ली आणि इतर राज्यांच्या निवडणुकांवर मोठा प्रभाव राहिला आहे. बिहारच्या मतदारांमध्येही हेच चित्र दिसून येईल, असे आजघडीचे अनुमान आहे..

दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# शीतयुद्ध संपले, शीतयुद्ध सुरू!

२०२५ हे वर्ष नव्या जागतिक इतिहासाचा साक्षीदार ठरत आहे. रशिया- युक्रेन युद्धाला तीन वर्ष झाली असताना, संयुक्त राष्ट्रात रशियाविरुद्धच्या निंदाजनक ठरावावर अमेरिकेने रशियाची बाजू घेत एक नवा जागतिक इतिहास नोंदविला.

संयुक्त राष्टाच्या स्थापनेचे शिल्पकार होते अमेरिकेचे एक राष्टपती रुझवेल्ट. दुसऱ्या महायुद्धात अमेरिका आपल्या मित्र देशांना 'संयुक्त राष्टे' म्हणून संबोधित असे. त्याच नावाने संयुक्त राष्ट नावाचे व्यासपीठ स्थापन झाले. अमेरिका विरुद्ध सोवियत युनियन- रशिया यांच्यातील शीतयुद्धाचा हे व्यासपीठ एक आखाडा होते. अमेरिका आपल्या मित्रदेशांना सोबत घेत सोवियत युनियन- रशियाला मात देत होती. आज त्याच आखाड्यात अमेरिकेने आपल्या मित्रदेशांना वाऱ्यावर सोडीत रशियाचा हात पकडला.

**नवा अध्याय** : अमेरिका-रशिया यांच्यातील शीतयुद्धावर, हेरगिरीवर आजवर हजारो पुस्तके लिहिली गेली, शेकडो चित्रपट काढले गेले. मात्र २०२५ मध्ये अमेरिका-रशिया यांच्यातील मैत्रीचे नवे पृष्ठ राष्टपती पुतिन- राष्टपती ट्रम्प यांनी संयुक्तपणे लिहिले आहे. हा सारा घटनाक्रम जगाच्या राजकारणाला प्रभावित करणारा ठरणार आहे. अमेरिका-रशिया मैत्रीने मागील ७५ वर्षांपासून दोन देशात सुरू असलेले शीतयुद्ध संपले आहे तर दुसऱ्या एका शीतयुद्धाचा प्रारंभ होत आहे. हे दुसरे शीतयुद्ध आहे- अमेरिका आणि युरोप यांच्यातील.

**जगाचे दोन भाग** : जगाची विभागणी दोन भागांत होत होती- स्वतंत्र जग आणि बंदिस्त जग! लोकशाही मानणारे जग आणि हुकूमशाही मानणारे जग. यात अमेरिका स्वतंत्र जगाचे नेतृत्व करीत होती तर हुकूमशाहीचे समर्थन करणाऱ्या जगाचे नेतृत्व पूर्वीच्या सोवियत युनियनकडे म्हणजे आताच्या रशियाकडे होते. आता हे दोन देश एकत्र आले आहेत.

**नेतृत्व गमावले** : रशियासोबत मैत्री केल्यानंतर अमेरिकेने स्वतंत्र जगाचे नेतृत्व गमावले आहे. नाटोच्या माजी सैन्य अधिकाऱ्यांनी अमेरिकेच्या नव्या भूमिकेवर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. अमेरिकन पत्रकार, डेमोक्रॅटिक व रिपब्लिकन पक्षाचे नेतेही ट्रम्प यांच्यावर संतापले आहेत. नेतृत्व मिळण्यासाठी जबाबदारीही आवश्यक असते. अमेरिकेने युक्रेनला झिडकारीत आपली जबाबदारी झटकली आणि हे करीत अमेरिकेने स्वतंत्र जगाचे नेतृत्वही गमावले. एकापेक्षा एक अशा मातब्बर सेनापतींनी अमेरिकेच्या या निर्णयावर टीका केली आहे.

**सर्वांत मोठा यू-टर्न** : संयुक्त राष्ट्राचे व्यासपीठच मुळी अमेरिका-रशिया या दोन महाशक्तींमध्ये विभागलेले होते. जगातील बहुतांश देश एक तर 'या' गटात वा 'त्या' गटात असे करीत होते. पं. नेहरूंनी या दोन्ही गटांपासून समान अंतर ठेवीत अलिप्त राष्ट गट स्थापन केला. या गटाने चांगले बाळसे धरले असताना सोवियत युनियनचे पतन झाले आणि जग एक खांबी झाले. त्या ओझ्याखाली अलिप्त राष्ट चळवळ कोसळली. आता तर अमेरिका-रशिया चक्क एक झाले आहेत. जागतिक राजकारणातील हा आजवरचा सर्वांत मोठा यू-टर्न मानला जाईल.



**झेलेन्स्की नवा नेता?** : अमेरिकेकडे नाटोचे अघोषित नेतृत्व होते. जवळपास आठ दशके नाटोचे अस्तित्व कायम राहिले आणि ताज्या रशिया-युक्रेन युद्धाने तर नाटोला जणू संजीवनी मिळाली. युक्रेन युद्ध सुरू होताच अमेरिकेचे तत्कालीन राष्टपती जोसेफ बायडेन यांनी आपल्या पत्नीला युक्रेनला पाठवून मोठा संदेश दिला होता. राष्टपती ट्रम्प यांनी हे सारेच बदलले आहे. अमेरिका-नाटो फारकत झाली आहे. आता नाटोला नव्या नेत्याचा शोध घ्यावा लागणार आहे. जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन हे नाटोच्या नेतृत्वाचे दावेदार असताना, युक्रेनचे राष्टपती झेलेन्स्की युरोपचे नवे नेते म्हणून समोर येऊ शकतात असे मानले जात आहे. बलाढ्य रशियाला तीन वर्ष झुंझवत ठेवणे ही काही साधी बाब नव्हती. युक्रेनने रशियाला या युद्धात मोठे नुकसान पोहोचविले. काही लाख रशियन सैनिक- लष्करी अधिकारी या युद्धात मारले गेले असल्याचे मानले जाते. राष्टपती ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांचा उल्लेख कॉमेडियन असा केला असला तरी युरोपच्या क्षितिजावर एक धीरगंभीर नेता म्हणून त्यांचा उदय झाला आहे हे मान्य करावे लागेल.

**नाटो विरुद्ध ब्रिक्स** : अमेरिका-रशिया एकत्र आले असताना जागतिक राजकारणात नाटो आणि ब्रिक्स असे दोन गट तयार झाले आहेत. एका गटात भारत, रशिया, चीन हे देश आहेत तर दुसरीकडे ब्रिटन, जर्मनी, इटली, फ्रान्स हे प्रगत देश आहेत. या दोन गटांत आजवर नाटोचे पारडे जड मानले जात होते. मात्र आता अमेरिका नाटोपासून दूर गेल्याने ब्रिक्सची स्थिती बळकट होणार आहे. पण, याचा अर्थ जागतिक अर्थकारणात ब्रिक्सचे एखादे चलन सुरू होईल असा मात्र नाही. ब्रिक्स संपले आहे अशी दर्पोक्ती राष्टपती ट्रम्प यांनी केली आहे.

**ब्रिटनचा निर्धार** : दुसऱ्या महायुद्धात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ब्रिटनने पुन्हा एकदा मोठी भूमिका बजावण्याचा निर्णय घेतला आहे. ब्रिटिश पंतप्रधान सर स्टार्मर यांनी ब्रिटिश संसदेत आपल्या निर्णयांची घोषणा केली. ब्रिटन युक्रेनला सर्व प्रकारची मदत करील हे त्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात घोषित केले. सर स्टार्मर यांनी घोषित केलेला दुसरा निर्णय म्हणजे ब्रिटनने आपल्या सरंक्षण खर्चात वाढ करण्याचे ठरविले असून २.५ टक्के जीडीपी सरंक्षणावर खर्च करण्याचा निर्णय त्यांनी घोषित केला. काही सदस्यांनी तर ३ टक्के जीडीपी सरंक्षणावर खर्च करण्याची मागणी केली होती. जेव्हा जेव्हा युरोपमध्ये अनिश्चितता येते, ती ब्रिटनच्या किनाऱ्यावर येऊन थांबते असे मार्मिक विधान स्टार्मर यांनी आपल्या भाषणात केले.

**माध्यमांचा उद्रेक** : दरम्यान, अमेरिकेत राष्टपती ट्रम्प यांच्या या निर्णयाच्या विरोधात प्रसारमाध्यमांचा उद्रेक होत आहे. ट्रम्प यांनी मानसिक संतुलन गमावले आहे असा सूर ही माध्यमे नोंदवत आहेत.

**सावध चीन** : अमेरिका- रशिया मैत्रीकडे चीन मात्र सावधपणे पाहात आहे. चीन-रशिया एकत्र आले तेच मुळी अमेरिकेला शह देण्यासाठी. आता अमेरिका-रशिया यांनी मैत्री करण्याचा निर्णय घेतला आहे. रशिया आता आपल्यासोबत राहणार की अमेरिकेसोबत हा प्रश्न चीनला भेडसावणार आहे. अमेरिका-रशिया मैत्री किती वाढते, किती काळ चालणार याकडेही चीनचे लक्ष राहणार आहे. चीन स्वाभविकच या मैत्रीवर खूश राहण्याची जराही शक्यता नाही. मात्र ते त्याने दाखविलेले नाही.

**मुस्लिम जगत** : अमेरिका-रशिया युतीनंतर मुस्लिम जगत पूर्णपणे चीनकडे झुकेल असे मानले जाते. आजवर काही मुस्लिम देश रशियाची संबंध ठेवून होते. मात्र रशियाने अमेरिकेसोबत नांदण्याचा निर्णय घेतल्यानंतर मुस्लिम जगताला चीनसोबत जाण्याशिवाय पर्याय राहणार नाही असेही मानले जाते.

**भारताचा विरोध सुरूच** : दरम्यान, राष्टपती ट्रम्प यांनी भारत विरोधाची भूमिका सुरूच ठेवली असल्याचे दिसते. त्यांनी काही भारतीय कंपन्यांवर निर्बंध लावण्याचा निर्णय घेतला आहे. दुसरीकडे, अमेरिका-रशिया जवळ आल्याने भारताला काहीही फरक पडणारा नाही. उलट हे भारताच्या फायद्याचे ठरणार आहे. मात्र, ट्रम्प यांची भारतविरोधाची भूमिका जरा संभ्रम निर्माण करणारी आहे. ट्रम्प यांच्या चार वर्षांच्या कारकीर्दीचे जेमतेम ४० दिवस सरले आहेत. येणाऱ्या काळात ट्रम्प नावाचे वादळ शांत होईल आणि भारत-अमेरिका संबंध पूर्ववत होतील अशी आशा भारताला वाटत आहे.

वेध

अनिरुद्ध पांडे

# ढासळली केजरी'वॉल'

दिल्ली म्हणजे दिल्लीच. पौराणिक काळापासून इतिहास आणि वर्तमानातही दिल्लीचे महत्त्व भारत देशात अव्वलच राहिले आहे. पौराणिक काळात या शहराचे नाव दिल्ली नव्हते. पण इतिहास, वर्तमान आणि भविष्यातही हे शहर या देशाची राजधानी होती, आहे आणि राहणारच आहे. पूर्वी स्वतंत्र भारतात केंद्रशासित प्रदेश असलेल्या दिल्लीचे १९९३ पासून राज्य झाले. विधानसभा स्थापण्यासाठी निवडणूक होऊ झाली. हे राज्य दिल्ली असल्यामुळे या राज्याला स्वाभाविकच वेगळे महत्त्व प्राप्त झाले. उत्तरप्रदेश ४०३, महाराष्ट्र २८८, बिहार २४३ अशी आमदार संख्या असलेल्या मोठ्या राज्यांपेक्षाही केवळ ७० आमदार असलेल्या दिल्लीला थोडे जास्तच महत्त्व आले. भारताच्या राजधानीला 'कव्हर' करणारे हे राज्य असल्यामुळे तेथील विधानसभा निवडणूक ही संपूर्ण देशासाठीच लक्षवेधी असते. यंदा २०२५ च्या फेब्रुवारीत दिल्ली विधानसभेची निवडणूक पार पडली. यापूर्वीच्या दोन निवडणुका आम आदमी पार्टी म्हणजेच 'आप' या नवख्या पक्षाने अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वात जिंकल्या होत्या. २०१५ मध्ये ७० पैकी ६७ आणि २०२० मध्ये ६२ असे दणदणीत बहुमत 'आप'ने मिळविले होते. दिल्लीच्या मतदारांची गंमत अशी की, त्यांना विधानसभेत 'आप'च आणि लोकसभेत 'भाजपा'च हवी, असे यापूर्वी दिसले होते. २०१४, २०१९ आणि २०२४ अशा तीनही लोकसभा निवडणुकांत दिल्लीकरांनी सातपैकी एकही खासदार 'आप'ला दिला नव्हता. दुसरीकडे २०१५ व २०२० चे आपले बहुमत पाहून मुख्यमंत्री केजरीवालांनी 'मोदींना या जन्मात दिल्ली विधानसभा जिकता येणार नाही', अशा वल्गनाही केल्या होत्या.

या साऱ्या पृष्ठभूमीवर २०२५ ची दिल्ली विधानसभा निवडणूक प्रसार माध्यमांसाठी प्रचंड उत्सुकतेचा विषय होता. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी दिल्ली विधानसभेचे निकाल लागले. 'आप'चा त्यात निक्काल लागला. ७० पैकी भाजपाचे ४८ तर आपचे फक्त २२ आमदार झाले. या निकालाच्या बातम्या वृत्तपत्रांत ९ फेब्रुवारीला आल्या. मराठी, हिंदी आणि इंग्रजी दैनिकांनी या निकालाचे विश्लेषण कसे केले, त्याला कसे कल्पकतेने सादर केले, हाही आकर्षणाचा विषय ठरला. भारतातील मान्यवर इंग्रजी दैनिक 'टाईम्स ऑफ इंडिया'ने आपल्या मुख्य बातमीचा मथळा 'डबल इंजिन फॉर राजधानी' असा घेतला. यात त्यांनी 'दिल्ली'ऐवजी 'राजधानी' असा शब्द वापरून दिल्लीहून सुटणाऱ्या 'राजधानी' या रेल्वे गाडीचा संदर्भही जोडला. 'हिंदुस्तान टाईम्स'ने 'बीजेपी शॅटर्स केजरी'वॉल' म्हणजेच 'भाजपाकडून केजरी'वॉल' उद्ध्वस्त' असे म्हटले. 'हिंदू'ने 'बीजेपी स्विप्स कॅपिटल' म्हणजेच 'भाजपाने राजधानी झाडून टाकली' असा मथळा घेतला. 'गार्डियन'ने 'आप स्वेप्ट आऊट ऑफ पॉवर बाय बीजेपी', 'भाजपाकडून आप झाडून सत्तेबाहेर' असे नोंदवले. 'ट्रिब्युन'ने 'सॅफरॉन राईज, केजरी फॉल', 'केशरी उगवले, केजरी समाप्त' असे म्हटले. 'गार्डियन'ने 'बीजेपी रिगेन्स पॉवर आफ्टर २७ इयर्स, आप फेसेस ह्युज सेटबॅक' म्हणजेच 'भाजपा २७ वर्षांनी सत्तेत, 'आप'ला मोठा दणका' असे म्हटले. 'संडे स्टँडर्ड'ने 'आम आदमी टर्न्स टू बीजेपी', 'आम आदमी भाजपाकडे' असे म्हणून आम आदमी पार्टीला हाणले. तर 'हितवाद'ने 'बीजेपी रिटर्न्स टू पॉवर' अशी साधी प्रतिक्रिया दिली.

हिंदीतील ख्यातनाम 'जागरण'ने 'दिल्ली में २७ साल बाद खिला कमल' असे म्हटले. 'ट्रिब्युन'ने 'लगे २७ साल, दिल्ली मे कमाल' असे लिहिताना कमालमधील काना फिक्का करून 'कमल' हा शब्द उठावदार केला. 'अमर उजाला'ने 'दिल्ली में भाजपा का वसंत, 'आप'की उम्मीदों पर झाडू' असे म्हणून आपच्या 'झाडू'ला लक्ष्य केले. 'भास्कर'ने 'दिल से उतरे आप' म्हणून थेट प्रहार केला. 'पंजाब केसरी'ने 'दिल्ली बोली, मोदी मोदी' अशी प्रतिक्रिया दिली. 'जागरण'ने 'दिल्ली में भी डबल इंजन' अशी प्रतिक्रिया दिली. 'जनसत्ता'ने 'मोदी है तो मुमकिन दिल्ली' असे म्हटले. तर 'नवभारत टाईम्स'ने 'हॅपी लोटस डे' असे नोंदले. 'नवभारत'ने 'भाजपा बेमिसाल, ढह गयी केजरी'वॉल' असा मथळा घेतला. 'लोकमत समाचार'ने 'दिल्ली ने 'आप'के शीशमहल पर फेरी झाडू' असे 'आप'ला गुंडाळले. मराठीमध्ये नवराष्ट्रने 'काँग्रेस बनली कीलर : सूड पूर्ण' असा मथळा घेतला. 'सकाळ'ने 'दिल्लीत कमलराज' सोबतच 'पराभवाची 'आप'त्ती, काँग्रेसचा भोपळा' अशी उपशीर्षके केली. 'दिव्य मराठी'ने 'मनातून उतरले आप' आणि 'लोकसत्ते'ने 'आम आदमी की करामत' असे आपले मथळे केले. 'लोकमत'ने 'शीशमहल ढासळला, कमळ फुलले' असे म्हटले, तर 'महाराष्ट्र टाईम्स'ने 'दिल्लीचा सत्ताकुंभ भाजपकडे' आणि 'लोकशाही वार्ता'ने 'भाजप २७ वर्षांनंतर दिल्लीत' असे म्हटले. 'पुण्यनगरी'ने 'दिल्लीत 'आप'ला भाजपाने 'आप'टले' अशी छान कोटी केली, तर 'देशोन्नती'ने 'झाडूही तुटला, हातही रिकामाच' असे म्हणून दोघांनाही जागा दाखवून दिली. 'तरुण भारत'नेही 'कमळाची कमाल, ढासळली केजरी'वॉल' असा क्लासिक मथळा घेतानाच, 'दिल्ली 'आप'दा मुक्त, आर्यभट्टाने लावलेला शोध काँग्रेसला भावला' अशी मस्त टोलेबाजी केली, हे विशेष.

९८८१७१७८२९

कानोसा

अमोल पुसदकर

# जाकी रही भावना जैसी

'जाकी रही भावना जैसी, प्रभू मूरत तीन देखी तैसी' हे आपण ऐकलेले आहे. मागील दीड महिन्यापासून संपूर्ण देशामध्ये वृत्तवाहिन्यांवर, समाज माध्यमांवर, वृत्तपत्रांमध्ये जनतेच्या बोलण्यामध्ये सर्वत्र एकच विषय चर्चिला जात होता आणि तो म्हणजे प्रयागराज येथील महाकुंभ. प्रयागराजच्या महाकुंभाची तुलना दुसऱ्या कशाशीही करता येत नाही. राम-रावणाचे युद्ध कसे होते तर राम-रावणाच्या युद्धासारखे होते. समुद्र कसा आहे तर समुद्रासारखा आहे. महाकुंभ कसा होता तर महाकुंभासारखा होता. याच्या आधी इतका भव्य दिव्य महाकुंभ कधीही झाला नाही आणि पुढील अनेक वर्ष केव्हा होईल हे सांगता येत नाही. अगदी डोळ्याचे पारणे फेडणारा, सुखद अनुभव देणारा असा हा महाकुंभ होता.

कुंभाला गेलेल्या प्रत्येक व्यक्तीला काही ना काही त्रास सहन करावा लागला. परंतु जवळपास सर्वच लोकांचे म्हणणे असे होते की एकदा पवित्र संगमावर डुबकी मारल्यानंतर कित्येक किलोमीटर चालण्याचे वाहतुकीमुळे मध्ये कित्येक तास थांबण्याचे जे सर्व काही श्रम होते ते निघून जात होते. आणि मनामध्ये भावना येत होती 'याच साठी केला होता अट्टहास' काहीही झाले तरी चालेल, कितीही वेळ लागला तरी चालेल परंतु एक डुबकी आस्थेची तर मारलीच पाहिजे.

या महाकुंभामध्ये प्रत्येकाची जी भावना होती त्याप्रमाणे त्याला महाकुंभाचे दर्शन झाले. जे पुण्यप्राप्तीकरिता गेले होते त्यांना पुण्यप्राप्ती झाली. जे साधू महात्मा महंत आले होते ते मोक्षाच्या दिशेने आणखी समोर सरकले. जे गरीब होते त्यांना व्यवसाय मिळाला. जे व्यापारी होते त्यांना व्यापार मिळाला. ज्यांच्या मनामध्ये अस्वच्छता होती त्यांना अस्वच्छता दिसली. ज्यांच्या मनामध्ये नियोजन होते त्यांना महाकुंभाचे नियोजन दिसले. प्रत्येकाला त्याच्या आंतरिक भावनेप्रमाणे महाकुंभाचे दर्शन झाले.

बरेचदा अनेकांना अनेक गोष्टींची उत्तरे मिळत नाही. महाकुंभामध्ये ६० कोटी लोकांपेक्षा अधिक लोक कसे काय पोहोचले याचे उत्तर अनेकांना मिळत नाही आहे. त्यामुळे त्यातील काही लोक असे म्हणतात की सोशल मीडिया म्हणजे समाज माध्यमांवर याचा प्रचार खूप झाला त्यामुळे लोक पोहोचले असतील. वास्तविक पाहता समाज माध्यमांवर अनेक गोष्टी दाखविल्या जातात त्यांचा प्रचार होतो परंतु अनेकदा त्यांना यश मिळत नाही. ६० कोटी लोकांना प्रचंड वाहतूक कोंडी, गर्दी, रात्र रात्रभर प्रवास आणि तिथे पोचल्यावर सुद्धा पहाटेच्या दोन वाजता, तीन वाजता गंगा स्नान आणि तत्काळ परत असाही कार्यक्रम करावा लागला. हे सर्वच अनुभव देशभर पोहोचत होते. काही वेळा तिथे जी चेंगराचेंगरी झाली त्याच्याही बातम्या देशभर पसरत होत्या. तरीसुद्धा या सर्वच बातम्यांना न जुमानता हे सर्व लोक तिथे पोहोचले. अनेक कारणांपैकी एक कारण म्हणजे हा १४४ वर्षांनी आलेला महाकुंभ होता. प्रत्येकानेच असा विचार केला की मी काय माझे मुलं बाळ सुद्धा पुढले १४४ वर्ष या पृथ्वीतलावर राहणार नाहीये. त्यामुळे आम्ही हा अनुभव घेतला पाहिजे.

मी बाजारात भाजी घेत होतो. ज्याच्याकडून भाजी घेत होतो तो म्हणाला की, महाकुंभामध्ये चेंगराचेंगरी झाली. त्यात अनेक लोक मारले गेले. अशा असुरक्षित गर्दीच्या ठिकाणी लोकांनी जायलाच कशाला पाहिजे. त्यावर मी त्याला म्हणालो की, तुमचे दुकान चौकामध्ये अगदी एका कडेला आहे. तुम्ही इथे सुरक्षित आहात का? कुठलाही एखादा ट्रक, एखादे वाहन तुम्हाला सुद्धा धडक देऊ शकते. त्यामुळे इथे गर्दी नसली तरीही तुम्ही सुरक्षित नाही. मी त्याला म्हणालो की, ६० कोटी लोकांमध्ये ३५ लोक मारले गेले हा आकडा कदाचित जास्तही असेल तरीसुद्धा उरलेले ५९ कोटींपेक्षा जास्त लोक सुखरूप आपल्या घरी पोहोचले ही सुद्धा ईश्वराचीच कृपा आहे. त्यामुळे तुम्ही इथे भाजी विकत असताना जर सुरक्षित आहात तर तेही ईश्वरामुळे आणि ५९ कोटी लोक घरी पोहोचले तेही ईश्वरामुळे.

सोनिया गांधी, राहुल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरे आणि इतरही राजकीय पक्षांच्या लोकांनी सुद्धा या महाकुंभामध्ये स्नान करायला जायला पाहिजे होते. तुमची राजकीय निष्ठा कोणावरही असू शकते परंतु तुमची धार्मिक निष्ठा आपल्या धर्मावर आहे की नाही? यातील अनेक लोक नेहमी हिंदू धर्मातील जाती प्रथेवर, उच्च-नीचतेवर बोट ठेवतात. करोडे लोक महाकुंभामध्ये आपल्या जातिपातीचा कुठलाही विचार न करता एकत्र येऊन एकाच ठिकाणी स्नान करीत होते आणि आनंदाने आपापल्या घरी जात होते. तेथे उभारण्यात आलेल्या हजारो साधू संतांच्या तंबूमध्ये जेवण करत होते. ही घटना सामाजिक समरसतेच्या दृष्टिकोनातून फार मोठी होती. परंतु नेहमीच हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेचा उद्धार करणारे हे लोक यांना याप्रसंगी काहीही बोलावेसे वाटले नाही व स्वतः जावेसे ही वाटले नाही.

समाजातले पैसेवाले अदानी, अंबानी, महिंद्रासारखे मोठमोठे उद्योगपती सुद्धा या महाकुंभात आले. त्यांनीही स्नान केले. त्यांनीही आपापल्या कंपनीतर्फे अन्नछत्र चालविले. ज्याला जे जे सुचले त्यांनी ते ते चांगले करण्याचा प्रयत्न केला. गर्दी वाढायला लागली म्हणून प्रयागराजपासून दहा किलोमीटर अंतरावरच लोकांना थांबवण्यात आले. तिथेच त्यांना गाड्या ठेवाव्या लागल्या. तिथून जायचे कसे असा प्रश्न होता. लोक दहा दहा किलोमीटर स्वतःहून पायी चालत गेले. मग गावातल्या काही लोकांना वाटले की आपण ऑटोद्वारे या लोकांना सोडले पाहिजे. त्यांनी ऑटोने लोकांना संगमावर सोडणे सुरू केले. जेव्हा ऑटो सुद्धा अपुरे पडू लागले तेव्हा लोकांनी आपल्या दुचाकीने लोकांना संगमावर सोडले. ज्यावेळेस हे सुद्धा अपुरे पडले त्यावेळेस लोकांनी हात ठेल्यावर भक्तांना त्यांच्या सामानासह बसवले व ढकलत ढकलत संगमापर्यंत पोहचवले. ज्याला सेवा करायची होती त्यांनी सेवा केली. ज्याला व्यापार करायचा होता त्याने व्यापार केला. ज्याला पुण्य कमवायचे होते त्यांनी पुण्य कमवले. हा महाकुंभ न भूतो न भविष्यति असा होता. हिंदू धर्माची प्रचंड मोठी शक्ती या निमित्ताने संपूर्ण जगाला पाहायला मिळाली. निवडणुका आल्या की जातिपातीमध्ये विभागाला जाणारा हाच तो समाज आहे जो आज कुंभाच्या निमित्ताने एकत्र आलेला होता. २०२५ मध्ये सुद्धा हिंदू सनातन धर्माच्या नावाने एकत्र आला ही सुद्धा खूप मोठी गोष्ट आहे. हे दृश्य पाहून कोणाची छाती अभिमानाने फुगलेली आहे तर कोणाला पोटशुळ झालेला आहे. शेवटी काय 'जाकी रही भावना जैसी' हेच खरे आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

वाचक पत्रे

## मराठीचे आग्रही व्रत

मराठी आपली मातृभाषा. मनाच्या अगदी जवळ असणारी. व्यक्त होण्यास सुलभ अशी माय मराठी. २७ फेब्रुवारीला मराठी भाषा दिवस साजरा केला गेला. अभिजात दर्जा प्राप्त झाला म्हणून प्रत्येक मराठी त्या आनंदाच्या लाटेवर स्वार झाला. मराठीचा अभिमान प्रत्येकाने मनापासून बाळगला पाहिजे. मराठी वाचली, बोलली, लिहिली गेली पाहिजे हेच मराठीचे व्रत आहे आणि त्याबाबत प्रत्येक मराठी माणसाने जागृत राहिले पाहिजे. इतर भाषा अवश्य शिकाव्यात पण मराठीचा आग्रह असावा हे निश्चित.

नुकतेच मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक शाळेत मराठी विषय असायलाच हवा असा आदेश दिला. महाराष्ट्रात तर मराठी भाषा प्रत्येक व्यक्तीला यायलाच हवी. किमान तसा प्रयत्न व्हायला हवा. घराघरात मराठीचे संस्कार व्हायला हवे. आपल्या भाषेला आपण जपले पाहिजे तेव्हाच ती अभिजात दर्जाची होईल. पण '५०० मराठी शाळांना कुलूप' ही बातमी वाचनात आली आणि मन दुखावले. इंग्रजीचा अट्टहास असल्याने मराठीकडे पालक जात नाही आणि त्यामुळे इंग्रजी शाळांची संख्या वाढते आहे आणि मराठी शाळा बंद पडत आहे. मराठीला आपली भाषा म्हणून जपले पाहिजे. मराठी साहित्य समृद्ध आहे त्याचा अभ्यास व्हायला हवा. मराठी माझी आहे असे म्हणताना अभिमानाने मान ताठ व्हायला हवी. मराठी जपली पाहिजे तरच तिचा दर्जा टिकून राहील.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

●● ●●

## प्रयागराजचा एकतेचा यशस्वी महाकुंभ

महाशिवरात्रीला प्रयागराज येथे महाकुंभाची सांगता झाली. या महाकुंभात विविध पीठाचे शंकराचार्य, आखाड्यांचे महामंडलेश्वर, सिद्ध योगी संत, संन्यासी, श्रीमंत व गरीब सगळ्यांनी संगमात एकाच ठिकाणी पवित्र स्नान करून कुठल्याही प्रकारचा भेदभाव व जातिभेद न ठेवता जगाला एकतेचा संदेश दिला. हीच सनातन हिंदू धर्माची सुंदरता व शिकवण आहे. यापूर्वीच्या कुंभमेळ्यात असे कधीही घडले नाही ज्यामध्ये अर्ध्यापेक्षा जास्त जवळपास ६५ कोटी हिंदूंनी आपला सहभाग नोंदविला. जे महाकुंभात जाऊ शकले नाहीत ते मानसिकदृष्ट्या महाकुंभाशी जोडले गेले. हिंदूंचे जातिपातीत विभाजन करून निवडणूक जिंकून सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांनी लोकसभेच्या निवडणुकी दरम्यान निवडणूक जिंकल्यास जातनिहाय जनगणना करू असे आपल्या जाहीरनाम्यात नमूद केले होते. नुकत्याच झालेल्या उत्तरप्रदेशच्या पोटनिवडणुकीत अखिलेश यादव यांनी पिछडा, दलित व अल्पसंख्यक (पीडीए) असे समीकरण मांडून निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात त्यांना यश आले नाही. परंतु पंतप्रधान मोदींनी याच प्रयागराजच्या भूमीवर सफाई कामगाराचे पाय धुऊन उच्च-नीच व जतीभेदाला सनातन हिंदू धर्मात स्थान नाही हे आपल्या कृतीतून दाखवून दिले. गोरखपीठाचा सामाजिक समरसतेचा जुना इतिहास आहे. गोरखपीठाच्या महंतांनीदोन भिन्न परिवारासोबत सहभोजन करून सामाजिक समरसतेचा संदेश दिला. योगी आदित्यनाथ त्याच परंपरेचे उत्तराधिकारी आहेत.

हिंदू समाजाचे होणारे ध्रुवीकरण लक्षात घेऊन योगी व मोदींनी 'बटेंगे तो कटेंगे' व 'एक है तो सेफ है' हा संदेश हिंदू समाजाला देऊन वेळीच सावध केले. हा महाकुंभ भविष्यात सनातन हिंदू धर्माला नवीन दिशा देणारा ठरेल यात तिळमात्र शंका नाही.

**शशिकांत दंडे**/नागपूर

●● ●●

## प्रतीक्षा केव्हा संपणार?

मनपाने उत्तम उपक्रम हाती घेतले. अनेक बागांमध्ये ओपन जिम उभारले, काहींना सेल्फी पॉईंट बनवले, तर काही ठिकाणी 'फूल महोत्सव' देखील झाला. असे असताना नागपूरच्या मध्यवर्ती शंकरनगर भागातील एक बगीचा मात्र या सर्व सुविधांपासून कायमच वंचित राहिलेला आहे. शंकरनगर मध्य वस्ती आणि प्रतिष्ठित लोकवस्ती. येथील त्रिकोणी बगीचा गेल्या वीस वर्षांपासून मूलभूत सुविधांपासूनही वंचित आहे. साधी कचरापेटी सुद्धा सापडणार नाही. काही वर्षांपूर्वी इथे सकाळी व्यायाम करणारी मंडळी दिसायची, तरुण जॉगिंगला यायचे. ज्येष्ठ नागरिकांच्या प्रातःस्मरणाच्या मंजळ सुरांनी सुप्रभात व्हायची. संध्याकाळी बालकांची किलबिल ऐकू यायची. पण आज या बागेत केवळ घाणीचे साम्राज्य आहे.

या दुर्लक्षित बागेच्या अस्वच्छतेमुळे डासांची समस्या वाढली आहे. येथे कोणीही वाली नाही. कोणीही येतो, कुठेही बसतो आणि कसाही वागतो. इतर बागांमधून हाकलून लावलेली जोडपी येथे येऊन निर्लज्जपणे वागताना दिसतात, कारण त्यांना टोकणारे कोणीच नाही. भटकी कुत्रीही इथे मुक्तसंचार करतात.

आज या बागेचे अस्तित्व केवळ घाणीचे साम्राज्य एवढेच राहिले आहे. 'फूल महोत्सव' तर दूरच, येथे झाडांना सुंदर पाने सुद्धा बघायला मिळत नाहीत. सुंदर आणि स्वच्छ नागपूरच्या संकल्पनेत हा बगीचा मात्र अजूनही वंचित आहे. सौंदर्यीकरणाच्या प्रतीक्षेत आहे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८७४९६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# मनपासमोर काँग्रेसचे विविध मागण्यांसाठी आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड ,दि. ०३ मार्च**

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनच्या पहिल्याच दिवस राज्यभरासह नांदेड मध्ये देखील शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने खा. रवींद्र चव्हाण यांच्या विशेष उपस्थितीत व उत्तर जिल्हाध्यक्ष बी.आर.कदम, दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वात ग्रामीण व शहरी समस्येविरोधात सोमवार (ता.३) रोजी मनपा समोर तीव्र आंदोलन करण्यात आले.



शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या, शेतमालाला हमीभाव द्या, शेतीला अखंडीत वीजपुरवठा करा. पीकविमा त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करा आदीसह नांदेड शहरातील मुलभूत सुविधा द्या. कचरा, रस्ते, पाणी, विद्युत पुरवठा आदी सुरळीत सुरू असाव्यात अशी मागणी यावेळी करण्यात आली. खा. रवींद्र चव्हाण यांनी शेती प्रश्न आणि शहरातील मुलभूत सुविधा आदी समस्येकडे लक्षवेधत केंद्र व राज्य सरकारवर जोरदार प्रहार केला. यावेळी आंदोलनाचे प्रस्तावित व सुत्रसंचालन कार्याध्यक्ष बालाजी चव्हाण यांनी केले. यावेळी अनेकांनी विचार मांडले. खा. रविंद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, डॉ. श्रावण रेपनवाड, अँड. सुरेंद्र घोडसकर, राजेश पावडे, केदार पाटील सांळुखे, एकनाथ मोरज, जयश्री पावडे, शमिम अब्दुला, प्रफुल्ल सावंत, शेर अल्ली, मुसुद खान, अब्दुल गफार, महेश देशमुख तरोडेकर, अजिज कुरेशी, संजय शेळगावकर, विठ्ठल पावडे, विलास पावडे, सुरेश हटकर, सतिश देशमुख तरोडेकर, सत्यपाल सावंत, मुन्ना अब्बास, गंगाधर सोनकांबळे, डॉ. रेखा चव्हाण, बालाजी गाडे, अतुल पेदेवाड, शंकर शिंदे, डॉ. करुणा जमदाडे, बापूसाहेब पाटील, मुन्तजिब, रहिम खान, प्रताप देशमुख, संदिप देशमुख, माधव पवळे, गणेश पाटील, ज्योती कदम, नसिम पठाण, संतोष कांबळे, दिपकसिंग हजुरीया, गगन यादव, संजय वाघमारे, अभिलाष पावडे, अनिल ठाकूर, अनिल कांबळे, अनिल चिमेगावकर, प्रा. वानोळे, उद्धव लांडगे, महेश शिंदे, अंबादास रातोळे, गोविंद पाटील, धनंजय उमरेकर आदीसह इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'स्वारातीम' विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुपदी डॉ. अशोक महाजन रुजू

**तभा वृत्तसेवा**
**नविन नांदेड,दि. ०३ मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डॉ. अशोक महाजन हे दि. ३ मार्च रोजी रुजू झाले आहेत. डॉ. महाजन हे विद्यापीठाचे पाचवे प्र-कुलगुरू म्हणून रुजू झाले आहेत. यापूर्वी डॉ. एस.एस. ऊके, डॉ. जे.एन. शिंदे, डॉ. जे.एन. बिसेन आणि डॉ. माधुरी देशपांडे (प्रभारी) यांनी या पदावरील कामे पाहिले आहेत.



डॉ. महाजन यांना अध्यापन, संशोधन आणि शैक्षणिक प्रशासन यामधील कामाचा ३७ वर्षापेक्षाही अधिक अनुभव आहे. इलेक्ट्रॉनिक विषयांमध्ये डॉक्टरेट असणारे डॉ. महाजन यांनी जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात २२ वर्षे अध्यापन केलेले आहे. त्यापैकी पाच वर्षे विद्यापीठ प्रशासनातील प्रमुख अशा 'कुलसचिव' पदावर त्यांनी काम केले आहे. त्यापूर्वी नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयांमध्ये जवळपास १५ वर्षे त्यांनी अध्यापन व संशोधन केले आहे. जगभरातील जवळपास २९ देशांना त्यांनी शैक्षणिक कमानिमित्त भेटी दिल्या आहेत. असा प्रदीर्घ शैक्षणिक, संशोधकीय आणि प्रशासकीय अनुभव असणारे डॉ. महाजन यांचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला निश्चितच फायदा होईल, अशी अपेक्षा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. या शिवाय विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी.डी. पवार, अधिष्ठाता डॉ. एम.के. पाटील, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. डी. एम. खंदारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी मोहमद शकील, डॉ. शैलेश वाढेर, डॉ. जगदीश कुलकर्णी, डॉ. सूर्यप्रकाश जाधव, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## संक्षिप्त वृत्त



### मोमीन शेख निसार महेबूब यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

**मुखेड**-तालुक्यातील अशोक विद्यालय एकलारा येथे गेल्या ३ दशकांपासून माध्यमिक सहशिक्षक गणित विज्ञानाचे विषयाचे विशेष शिक्षक म्हणून मोमीन शेख निसार महेबूब यांनी विद्यार्थ्यांना अध्यापनाचे धडे दिले.शेख सर यांचा प्रदिर्घ सेवेनंतर ते वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्ती निमित्त संस्थेच्या वतीने निरोप समारंभ व गौरव सन्मान सत्योकार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेच्या मुख्याध्यापिका चिंतेवार मॅडम यांच्या सह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्ती निमित्त विशेष सत्कार करून कार्यक्रमाची सुरुवात केली उपस्थितांनी आपल्या मनोगतातून मोमीन सरांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाची प्रशंसा केली व त्यांच्या सेवानिवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमास आजी - माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुवर्य शिक्षकांच्या आठवणींना उजाळा दिला कार्यक्रमाच्या शेवटी मोमीन शेख सरांनी सर्व सहकाऱ्यांसह विद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे अभार मानले. यावेळी अशोक विद्यालयाचे मुख्याध्यापीका सौ.कविता चिंतेवार मॅडम, म्यानेवार सर, वाघमारे सर, बिरादार सर, शेख सर,कागणे सर, पुरमवार सर ,वडजे मॅडम, तांबोळी सर, सोनकांबळे सर यांच्या सह कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अशोक सोनकांबळे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश



**नांदेड**-लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे विकासाभिमुख लोकप्रिय आमदार तथा नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून काल दि.२ मार्च रविवार रोजी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नांदेड येथील साई सुभाष निवासस्थानी राष्ट्रवादी अजित दादा पवार गटात जाहीर प्रवेश केला. यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी अशोक सोनकांबळे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात शाल श्रीफळ पुष्पहार घालून स्वागत करून पक्ष प्रवेश केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी आंबेडकरी चळवळीचे युवा नेते रवि गायकवाड, लोहा नगर परिषदेचे माजी नगरसेवक भास्कर पाटील पवार, शिक्षण जिल्हा पतपेढीचे चेअरमन अशोक पाटील मारतळेकर, उपाध्यक्ष सुहास मुळे, सचिन पवारसह मित्रपरिवार उपस्थित होता.

### कासराळीच्या कु. आएशा या चिमुकलीचा पहिला रोजा पूर्ण

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील कासराळी येथील सध्या नायगांव येथे वास्तव्यास असलेले सेवानिवृत्त एसटी वाहक शहा मैनोदीन हुसेनीशहा यांची मुलगी कु.शहा आएशा कासराळीकर हिचा रमज़ान मासारंभ मधील पहिला रोजा संपन्न झाला. कु.आयशा या चिमुकलीने आपल्या बाल आयुष्यातील पहिला रोजा(उपवास) ठेवल्याने सर्व मुस्लिम समाज बांधवांनी तिचे विशेष कौतुक केले आहे. आयशा ही आठ वर्षाची आहे. ती नायगांव येथील ब्लू बेल्स इंग्लिश शाळेत इयत्ता दुसरीत शिकत आहे. वडील सेवानिवृत्त वाहक शहा मैनोद्दिन,शहा अहेमद टेलर,महसूल सहाय्यक शहा अजिमोद्दीन, बँक सहाय्यक महमदरफी मदार,माजी बँकर फक्रूशा मदार, शेख गौस,शहा उस्मान, कवी, गीतकार जाफर आदमपूरकर आदींनी कु.आएशाचे विशेष अभिनंदन केले आहे.



# वादग्रस्त सायफळ वाळू घाट पुन्हा काढला खोदून

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०३ मार्च**

तालुक्यातील पैनगंगा नदी पात्राजवळील अतिदुर्गम भागात असलेल्या सायफळ वाळू घाटावरून वाळू चोरी करण्याचा प्रयत्न सुरु असून, यापूर्वी एकदा खोदलेला वाळू घाट वाळू तस्करांनी बुजवून रस्ता बनवत वाळू चोरी करण्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती मिळाल्याने सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली, तहसीलदार किशोर यादव यांच्या आदेशाने नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी मध्यरात्रीला सदरील ठिकाणी जाऊन पोलीस बंदोबस्तात तो वादग्रस्त सायफळ घाट पुन्हा एकदा खोदून काढत वाळू तस्करीचा रस्ता बंद केला.

त्यांच्या या धडक कारवाईचा जबरदस्त धसका घेऊन वाळू तस्करांमध्ये भागमभाग माजली असल्याचे दिसून येत आहे.

नुकतेच पडसा येथे कर्मचाऱ्यांना वाळू तस्करांनी धमकी दिली तर कालच अनमाळ ते हडसणी रस्त्यावर वाळू तस्करांनी महसूल पथकाला ६ किलोमीटर पळवत गुंगारा देऊन ट्रॅक्टर घेऊन पोबारा केल्याची घटना घडल्यानंतर यावर खबरदारी म्हणून 'ना रहेगा बास ना बजेगी बांसूरी' या उक्तीप्रमाणे वाळू चोरीसाठी रस्ताच राहू नये या उद्देशाने नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी दि.०२ व ०३ च्या मध्यरात्री सायफळ घाटावर खंदक खोदण्याची धडक कारवाई केली.

या कारवाईवेळी पोलीस पाटील हेमंत गावंडे पाटील, सपोउपनी संजीवन त्र्यंबकराव सानप, होमगार्ड पुरुषोत्तम नेवारे, होमगार्ड वसीम पठाण सोबत होते.

# विविध मागण्यांसाठी उद्या एकदिवसीय धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**नरसी,दि. ०३ मार्च**

एसबीसी अन्याय निवारण कृती समिती व विणकर सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने विविध मागण्यासाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण व धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाला पाठींबा म्हणून युनायटेड पद्मशाली संघटनेच्या वतीने उद्या दि. ५ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. तरी पद्मशाली समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन युनायटेड संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रोहीत अडकटलवार यांनी केले आहे.



वैद्यकीय, अभियांत्रिकी व इतर उच्च शिक्षणात विशेष मागास प्रवर्गासाठी (एस.बी.सी.) २ टक्के स्वतंत्र आरक्षण २०२५ च्या सत्रापासून लागू करावे. विशेष मागास प्रवर्गासाठी राज्यात १० आश्रम शाळा सुरू कराव्यात. विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के राजकीय आरक्षण लागू करावे. विद्यार्थीना जात पडताळणी प्रमाणपत्र तत्काळ दयावे, विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या योजना साठी एस.बी.सी. व केंद्र शासनाच्या योजनासाठी ओ.बी.सी. प्रमाणपत्र द्यावे, विशेष मागास प्रवर्गासाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ स्थापन करावे, एसबीसी विद्यार्थी साठी स्वतंत्र वस्तीगृह सुरू करावे, एसबीसी कर्मचाऱ्यांना शासकीय व निमशासकीय सेवेत पदोन्नती दयावी व विणकरांचे प्रश्न सोडविण्यासाठी विणकर आर्थिक महामंडळावर विणकरांची नियुक्ती करून लवकरात लवकर काम सुरू करावे. यासाठी एसबीसी अन्याय निवारण कृती समिती व विणकर सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने विविध मागण्यासाठी साखळी उपोषण व धरणे आंदोलन पुणे येथे जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवार दि. ५ ते ९ मार्च दरम्यान आंदोलन करण्यात येणार आहे. पुणे येथे होणार आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी काल दि. २ मार्च रोजी अखिल भारत युनायटेड पद्मशाली संघम संलग्न महाराष्ट्र राज्य युनायटेड पद्मशाली संघम व मराठवाडा युनायटेड पद्मशाली संघम सर्व प्रौढ युवक व महिला नांदेड जिल्हा व तालुका युनायटेड पद्मशाली संगमची महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रोहित अडकटलवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी पुणे येथील आंदोलनाला पाठींबा म्हणून नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. ५ मार्च रोजी सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अडकटलवार यांनी केले आहे.

# कुंडलवाडीत अज्ञात चोरट्याने फोडली दोन दुकाने

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. ०३ मार्च**

शहरात दि.२ मार्च रोज रात्री दोन दुकाने चोरट्यांनी फोडल्यामुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले असून या प्रकरणी कुंडलवाडी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.



कुंडलवाडी येथील मुख्य बाजार पेठेतील मैनोद्दिन मगदूम शेख व बाबा चुडीवाले यांनी नेहमी प्रमाणे आपली दुकाने उघडण्यासाठी दि.३ मार्च रोजी सकाळी आले असता चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी यांनी भेट देऊन दोन्ही दुकानाची पाहणी केली. शेख मैनोद्दीन मगदूमसाब भूसार दुकान यांनी काऊंटरमधील पन्नास हजार रूपये नगदी चोरट्यांनी नेले असल्याची तक्रार कुंडलवाडी पोलिस ठाण्यात दिली. तसेच रहीम किराणा दुकानातून चोरट्यानी नगदी (चिल्लर)आठ हजार रूपये चोरल्याचे तक्रार बाबा यांनी केले त्या वरून कुंडलवाडी पोलिस ठाण्यात अज्ञात इसमा विरुध्द गुन्हा दाखल केला असून पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे पुढील तपास करीत आहेत.

# दिलेल्या शब्दाप्रमाणे कर्जमाफी जाहीर करा : कलंबरकर

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद,दि. ०३ मार्च**

राज्यातला शेतकरी आर्थिक संकटात आहे. शेतीचा खर्च वाढला पण शेतीमालाचा भाव वाढला नाही.त्यामुळे शेतकऱ्यांवर कर्जाचा डोंगर वाढला.कालच्या विधानसभा निवडणूकीत सत्ता आली तर शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमाफी करू,शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू (कर्जमुक्त करू) अशी घोषणा मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडून करण्यात आली होती.त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने महायुतीला सत्ता दिली.आणि मा.देवेंद्रजी मुख्यमंत्री झाले. आता दिलेल्या शब्दाप्रमाणे पूर्ण कर्जमाफी जाहीर करावी अशी मागणी मा.ना.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे मा.तहसीलदार राजेश जाधव यांच्यामार्फत शेतकरी संघटनेचे शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी दिनांक ३ मार्च रोजी निवेदनातून केली आहे. दिलेल्या शब्दाप्रमाणे ३ मार्च पासून सुरु झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात चालू व थकीत शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमाफी जाहीर करावी. दरवेळी थकीत शेतकऱ्यांची कर्जमाफी होते.त्यामुळे चालू शेतकऱ्यांवर अन्याय होतोय.कर्जमाफी झाली तर शेतकऱ्यांच्या डोक्यावरचा कर्जाचा डोंगर कमी होईल.शेतकऱ्याला मोकळा श्वास घेता येईल. सरकारने दिलेल्या शब्दाप्रमाणे कर्जमाफी केली नाही तर शेतकरी सरकारच्या शब्दावर विश्वास ठेवणार नाही आणि भविष्यात शेतकरी कर्जमाफीसाठी रस्त्यावर येईल.म्हणून सरकारने दिलेल्या शब्दाप्रमाणे पूर्ण कर्जमाफी जाहीर करावी अशा इशारा निवेदनात दिला आहे.

# मुदखेड येथील बौद्ध धम्म परिषद उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०३ मार्च**

मुदखेड शहरात दर वर्षी प्रमाणे याही वर्षी तिसरी अखिल भारतीय बौध्द धम्म परिषद दि. ०२ मार्च रोजी मोठ्या उस्ताहात साजरी करण्यात आली.



सर्व प्रथम सकाळी ठिक ८:३० वाजता भिख्खू संघाच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. समता सैनिक दलाच्या वतीने पंचशील ध्वजास सलामी देत जय भीम चे आणि बौद्ध धम्माचा विजय असो अशा घोषणा देत ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. यानंतर ९:३० वाजता बौद्ध धम्म रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये समता सैनिक दलाचे पथसंचलन बौद्ध प्रशिक्षण केंद्र येथून भीम नगर,जुने पोलीस स्टेशन मराठा गल्ली, गुजरी मोहल्ला,मोंढा भागातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणी या बौद्ध धम्म रॅलीची सांगता करण्यात आली आहे. यानंतर दुपारी १२:३० वाजता तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून तिसऱ्या धम्म परिषदेचे उद्घाटन डॉ. उपगुप्त महाथेरो पुर्णा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ खेम धम्मो महाथेरो मूळावा, डॉ सत्यपाल महाथेरो संभाजीनगर, पययानंद थेरो लातूर, डॉक्टर इंदवंश महाथेरो औरंगाबाद, भिकुनी चारुशीला थेरी नांदेड, शीलरत्न थेरो नांदेड, पयारतन थेरो, महाकाशप थेरो,भिख्खू गगनबोधी मुदखेड, यांनी उपासक उपासिकांना धम्मदेसना दिली.

रात्री ८:०० वाजता प्रा. नितेश कराळे, कवि दंगलकार नितीन चंदनशिवे, समता सैनीक दलाचे मार्शल सारीपुत यांची व्याख्याने झाली. या धम्म परिषदे निमित्ताने त्यांनी युवकांना मार्गदर्शन केले. आणि सांगीतले आहे कि आजच्या युवकांनी आंबेडकर चळवळ जिवंत ठेवली पाहिजे आणि चळवळीचा रथ पुढे घेऊन गेला पाहिजे, युवकांनी व्यसनाच्या आहारी न जाता आय पी एस सी, यूपीएससी, याची तयारी केली पाहिजे.

असे प्रमुख व्याख्याते यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी भिमनगर, अशोका नगर, नविअबादी, लुबिंनी नगर, समता नगर, रेल्वे कॉलोनी,भिख्खू संघ बौद्ध तालुक्यातील व शहरातील उपासक,उपासिका, बालक बालिका, जेष्ठ नागरीक व युवकांची मोठ्या संख्येने उपस्थीती हाती.

# पंकज नगरात घरफोडी; रोख ५ हजार रूपयांसह लाखोंचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०३ मार्च**

पंकज नगर येथे चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून घरातील रोख ५ हजार रुपयांसह सुमारे लाख रुपयांचे दागिने चोरून नेले. ही घटना २८ फेब्रुवारीच्या मध्यरात्री घडली . १ मार्च रोजी दुपारी साडेचार वाजेचेदरम्यान, पंकजनगर धनेगाव घडली असून, याप्रकरणी नांदेड ग्रामीण ठाण्यात ३ मार्च रोजी गुन्हा नोंदविण्यात आला.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पंकजनगर, धनेगाव येथील रहिवासी राहूल गोणे तसेच त्यांचे कुटुंबीय २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजेदरम्यान, माळाकोळी येथे गेले. दरम्यान, राहूल गोणे यांच्या घरातील सर्व मंडळी घराला कुलूप लावून बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी २८ फेब्रुवारीच्या रात्री ते १ मार्च रोजी दुपारी साडेचार वाजेदरम्यान, गोणे यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश मिळवला. त्याचवेळी चोरट्यांनी गोणे यांच्या घरातील पलंगाच्या बॉक्समध्ये ठेवलेल्या डब्यातील रोख ५ हजार रुपयांसह सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण १ लाख रूपये किंमतीचा ऐवज चोरून नेला असल्याची माहिती पोलीस ठाणे अंमलदार शंकर नलबे व मदतनीस अंमलदार तुकाराम नागरगोजे यांनी दिली.

या प्रकरणी राहूल पुंडलिक गोणे यांच्या तक्रारीआधारे नांदेड ग्रामीण ठाण्यात ३ मार्च रोजी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांचे मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार हरीश मांजरमकर व त्यांचे सहकारी कर्मचारी या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

# हिंदु मंदीरांतील हजारो कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत : देवकीनंदन ठाकूर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ०३ मार्च**

हिंदूस्थानातील बहुंताश मंदिरे शासनाच्या अधिकाराखाली आहेत या मंदीरावर शासनाचा कब्जा असुन मंदिरातील जमलेले हाजारो कोटि रुपये शासनाच्या तिजोरीत जमा होत आहेत परंतु ह्या रुपयाचा फायदा हिंदूना होत नसुन हा ईतरत्र वापरला जात आहे शासनाने सनातन बोर्ड स्थापन करुन मंदीरातील पैसा या बोर्डाच्या माध्येमातुन हिंदु समाजाच्या प्रगती करीता वापरला जावा असे प्रतिपादन् आंतरराष्ट्रीय कथाकार देवकीनंदजी ठाकुर यांनी श्री क्षेत्र उमरज येथील येथील कार्यक्रमात हाजारो भाविकभकांना संबोधताना केले . श्री क्षेत्र उमरज येथे १०८ कुंडी यज्ञ व कलशारोहण कार्यक्रमा निमित्त दिनांक २७ फेब्रुवारी रोजी पासुन आंतराष्ट्रीय कथाकार देवकीनंदजी ठाकुर यांच्या मधुर वाणीतुन भागवत कथेस प्रारंभ झाले आज दिनांक ३ फेब्रुवारी रोजी कथेच्या पाचव्या दिवशी हाजारो जनसमुदायांना संबोधताना पुढे असे म्हणाले कि हिदुस्थान मध्ये हिंदु धर्मावर शासनाकडून अन्याय होत आहे देशातील हिंदु मंदिरातील प्रत्येक दिवशी ५ हजार कोटि रुपये शासनाच्या तिजोरीत जमा होत आहेत याचा उपयोग शासनाने सनातन बोर्ड स्थापन करुन या बोर्डाच्या मार्फत फक्त हिंदु समाजातील मुला मुलीच्या शिक्षण , आरोग्य ,युवकांचा उद्योग निर्मिती साठी झाला पाहीजे.



सनातन बोर्ड सनातन संस्कृतीचे रक्षण करेल आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी उपयुक्त ठरेल. वक्फ बोर्ड असू शकतो, तर सनातन बोर्ड का होऊ शकत नाही ?असा सवाल शासनाला ठाकुर यांनी केला .जो मदिरा दारु पीतो.जुवा खेळतो तो अशा लोकांची जो संगत करतो तो कदापि सनातनी आसु शकत नाही .तुम्ही धर्माची रक्षा धर्म तुमची रक्षा करेल .या कार्यक्रमाला आलोट जनसमुदाय उपस्थितीत होता .

श्रीक्षेत्र उमरज येथे महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा भा.ज.पा.चे राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण हे या कार्यक्रमात बोलताना असे म्हणाले नामदेव महाराज देवस्थान श्री क्षेत्र उमरज चे मठाधीपती एकनाथ महाराज यांनी खुप मेहनतीने मंदीराचे काम पुर्ण केले या नामदेव विठ्ठल मंदिराला पाहिल्या नंतर आयोध्यातील राममंदीराची आठवण झाली .केंद्रातील सरकार व राज्ये सरकार आमचेच आहे त्यामुळे या देवस्थान ला ब दर्जा मिळवुन देण्यास कट्टिब्दध आहे .असे चव्हाण म्हणाले यावेळी मठाधीपती एकनाथ महाराज ,एकनाथ दादा पवार आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर यांच्या अर्धांगणी प्रतिभाताई चिखलीकर ,भा.ज.पा.चे जिल्हाअध्यक्ष संतुकराव हंबर्डे ,संतोष पांडागळे ,चंद्रसेन पाटिल ,यांच्यासह आदि कार्यकर्ते उपस्थितीत होते.

# छत्रपती शिवाजी हायस्कूल सगरोळीची राज्यस्तरीय स्वच्छतेत चमकदार कामगिरी!

**तभा वृत्तसेवा**
**सगरोळी,दि. ०३ मार्च**

संस्कृती संवर्धन मंडळ संचालित छत्रपती शिवाजी हायस्कूल, सगरोळीच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा नवा आदर्श निर्माण करत संपूर्ण राज्यात आपल्या शाळेचे नाव उज्वल केले आहे. 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा २' या राज्यस्तरीय उपक्रमांतर्गत आयोजित 'स्वच्छता मॉनिटर' स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवत राज्यातील टॉप २५ शाळांमध्ये स्थान मिळवले आहे.विद्यार्थ्यांनी ४८६ व्हिडिओ आणि पोस्ट्स अपलोड करत तब्बल ११,८३७ गुण प्राप्त केले आणि राज्यभरात आपला दबदबा निर्माण केला आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धे च्या पहिल्या टप्प्यात छत्रपती शिवाजी हायस्कूल, सगरोळीने लातूर विभागात प्रथम क्रमांक पटकावला होता.राज्यातील १.५ लाखांहून अधिक शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता, त्यामुळे छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश अत्यंत गौरवास्पद आहे. विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा महत्वपूर्ण संदेश दिला. त्यांनी लघु व्हिडिओ तयार करून 'स्वच्छता मॉनिटर' फेसबुक पेजवर अपलोड केले, ज्यामुळे त्यांचे कार्य राज्यभर पोहोचले.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. प्रदीप जाधव यांनी विशेष पुढाकार घेतला, तसेच शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे मेहनत घेतली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे छत्रपती शिवाजी हायस्कूल, सगरोळीचे राज्यभरातून कौतुक होत आहे आणि संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे.संस्कृती संवर्धन मंडळ संचालित छत्रपती शिवाजी हायस्कूल, सगरोळीच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेच्या चळवळीत आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावत संपूर्ण राज्यात आदर्श निर्माण केला आहे .



**'स्वच्छता मॉनिटर' स्पर्धेत राज्यातील टॉप २५ शाळांमध्ये मानाचे स्थान!**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मतदारांच्या आशीर्वादामुळे मी, मंत्री झाले- नामदार मेघना साकोरे-बोर्डीकर

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर ,/प्रतिनिधी:-** तालुक्यातील नामदार मेघनाताई बोर्डीकर साकोरे यांची यांची परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री व ट राज्याच्या मंत्रिमंडळात निवड झाल्याबद्दल भोगाव येथील नागरिकांनी त्यांचा नागरिक सत्कार करण्यात आला संपन्न झाला.

या कार्यक्रमात च्या अध्यक्षस्थानी जिंतूरचे माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर हे होते तर या कार्यक्रमास भाजपचे सुरेश भुमरे प्रभाकर आप्पा वाघीकर ट भाजप तालुका अध्यक्ष गोविंद भाऊ थिटे भाजप उपजिल्हाध्यक्ष डॉक्टर पंडित दराडे जिंतूरचे माजी नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख पोखरणी येथील माजी सरपंच सुधाकर जाधव लिबाळ्याचे सामाजिक कार्यकर्ते दतराव काळे युवा तालुका अध्यक्ष



भाजपाचे माधवराव दराडे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रमोद राव चव्हाण भाजप तालुका अल्पसंख्यांक अध्यक्ष विजय वाकळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते यावेळी जिंतूर तालुक्यातील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सरपंच उपसरपंच यांच्यासह अनेक कार्यकर्तेमोठ्या संख्येने भाजपमध्ये कार्यकर्तेजाहीर प्रवेश केला यामध्ये भोगाव देवी येथील रवी सर राजेश देशमुख रेपा येथील येथील सरपंच नारायण मस्के सुकळीवाडी येथील माजी सरपंच सुभाष मोहिते लिंबाळा येथील सरपंच उमेश दराडे यांच्यासह भोगाव सर्कल मधील शंभर ते दीडशे कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीला सोडचिट्टी देऊन भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला यावेळी परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला या सरकारला सत्काराला उत्तर देताना नामदार मेघनाताई बोर्डीकर साकोरे यांनी म्हणाल्या की मी मंत्री झाले ते तुमच्या सर्व मतदारांच्या आशीर्वादामुळे मी मंत्री झालेमाझ्यावर मतदारांचे प्रेम व देशाचे भारतीय जनता पार्टीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणीस यांनी जो माझ्यावर विश्वास टाकला त्याला मी कुठल्याही प्रकारचा तडा जाऊ देणार नाही तसेच भोगाव व परिसरामधील नागरिकांनी अनेक समस्या मांडल्या त्या समस्या मी सर्व सोडविण्याचा प्रयत्न करणार अशी ग्वाही मंत्री मोहदययांनी दिली तसेच या प्रसंगी कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला पक्षाच्या धोरणावर विश्वास दर्शविला लोक कल्याण आणि विकासासाठी एकजुटीने राहण्याची ग्वाही दिली पक्षांमध्ये प्रवेश करणारे भोगाव रेपा खरदडीलिंबाळा पोखरणी नांदगाव येथील सरपंच व नवयुक्त या सर्व कार्यकर्त्यांना अनेक गावचयानागरिकांनी मोठ्या संख्येने प्रवेश केला आहे यामुळे जिंतूर तालुक्यातील भाजपची ताकद पुन्हा वाढणार व राष्ट्रवादीला मोठे खिंडार पडले आहे या कार्यक्रमासाठी भोगाव जिल्हा परिषद सर्कल मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजक रवी सर देशमुख यांनी केले होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री तोडकर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन रवी सर यांनी मांडली.

## संक्षिप्त वृत्त...

### कु.अरीबा आगाई हिचा जीवनाचा पहिला रोजा



**जिंतूर,/प्रतिनिधी :** येथील बरुड वेस चे रहिवासी डॉ.इमरान खान आगाई ह्यांची सुकन्या अरीबा खान ,७ वर्ष, हिने पवित्र रमजानच्या पहिल्या दिवशी , २ मार्च ,रविवारी,आपल्या जीवनाचा पहिला रोजा ठेवला. तिचा कौतुक सर्वत्र होत . ह्या प्रसंगी तिचे काका, जिंतूर चे डॉ. इरफान खान आगाई पटेल, शोएब खान आगाई, हन्नान मामा दुरानी, आमेर दुरानी, सय्यद शाहनवाज, आबेद देशमुख, खालेद देशमुख, इमरान पठान, इंजीनियर शाहबाज खान, उमर फारूक, शेख अलीम सर ,सय्यद अमजद,शेख अखिल ह्यांनी अभिनंद केले.

### हातनूरच्या कुस्त्यांच्या दंगलीत भगवान बाबर विजेते

**सेलू,/प्रतिनिधी :** हातनूर येथे महाशिवरात्री यात्रा महोत्सवाची निमित्त शुक्रवारी, २८ फेब्रुवारी रोजी कुस्त्यांची दंगल पार पडली. यामध्ये भगवान बाबर या कुस्तीपटूने ११ हजार एकशे अकरा रूपयांचे प्रथम पारितोषिक पटकावले. दुसरे पारितोषिक ७ हजार ७७७ रूपयांचे संदीप कार्ले, तर तिसरे पारितोषिक ५ हजार ५५५ रूपयांचे राम.मोरे या कुस्तीपटूने जिंकले. पहिले पारितोषिक नारायणराव निर्वळ यांच्याकडून, दुसरे पारितोषिक रमेश साखरे व सुभाष गाडे, तिसरे पारितोषिक दत्तराव रोकडे यांच्याकडून देण्यात आले.

पारितोषिक वितरणप्रसंगी मंदिर समितीचे एकनाथराव काकडे, तंटामुक्तीचे अध्यक्ष मोतीराम रोकडे, माजी सैनिक रमेशराव काकडे, नारायण निर्वळ, दत्तराव रोकडे, रमेश साखरे, सरपंच महेंद्र गाडे, अनिल बेटकर, संपतराव काकडे, पोलीस ट रामचंद्र पारवे उपस्थित . पंच म्हणून बळीराम चव्हाण, बाबासाहेब डुकरे, अंकुश आंधळे, कृष्णा आंधळे, सुभाष सहजराव यांनी काम पाहिले.

कुस्तीस्पर्धा यशस्वीतेसाठी बाबा आबुज, सचिन रोकडे, भास्कर आंधळे,वैभव गाडे, नाथा खवने , गोविंद शिंदे, अंकुश आंधळे,रामा ठाकरे स्वप्नील काकडे, नवयुवक तरुण यांनी परीश्रम घेतले. बंदोबस्तीसाठी पोलिस कर्मचारी श्री बुधवंत, श्री.आघाव, श्री. राठोड, श्री.पारधी व पोलीस ट रामचंद्र पारवे आदींनी सहकार्य केले.

### मनरेगा विभागातील कर्मचाऱ्याची शेतकऱ्यास मारहाण

**सेलू,/प्रतिनिधी :** पंचायत समिती कार्यालयातील मनरेगा विभागातील कंत्राटी (टीएसपी) कर्मचारी व गिरगाव येथील शेतकरी यांच्यात फिल्म स्टाईल हाणामारी झाल्याची घटना गुरुवार २७ दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. त्यात शेतकऱ्याचे डोके फुटल्याने त्याला येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले . घटनेची मिळताच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व कर्मचारी यांनी जखमीची भेट घेत प्रकरण मिटविले.गिरगाव येथील शेतकरी हे अनेक दिवसांपासून मनरेगा विहिरींसाठी कार्यालयात जोडे झिझवत . गावात अनेक शेतकऱ्यांना विहिरीचे कार्यारंभआदेश देण्यात आले . त्याबाबत विचारणा करण्यासाठी तो गुरूवार २७ दुपारी १२ वाजता पंचायत समिती कार्यालयात गेला होता, परंतु मनरेगा विभागाचा कंत्राटी कर्मचारी याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे दोघांमध्ये बाचाबाची होऊन प्रकरण चक्क हाणामारीपर्यंत गेले. या हाणामारीत कंत्राटी कर्मचाऱ्याने गिरगाव येथील शेतकऱ्याचे डोके फोडून जखमी केले. हा सर्व प्रकार पंचायत समिती कार्यालयातील कर्मचारी व उपस्थित नागरिकांनी पाहिला. त्यानंतर जखमी शेतकऱ्यास तात्काळ उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती समजताच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जखमी शेतकऱ्याची भेट घेऊन समजूत काढली.दरम्यान जेव्हा कर्मचारी एखाद्या शेतक-यावर शासकिय कामात आडथळा निर्माण केल्याचा गून्हा दाखल करतात तेव्हा त्र कूठलाही कर्मचारी शेतक-याची बाजू घेत नाहीत त्र कर्मचा-यानी मारहाण केली तर सर्व कार्यालय शेतक-यास विनवणी करत असल्याची प्रचिती यानिमित्ताने घडली असून असा मूजोर कर्मचा-यास अधिकारी अभय देत असल्याची चर्चा सूरू .

### जिल्हयात वाढला उन्हाचा पारा

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हयात गेल्या दोन ते तीन दिवसापासून उन्हाचा चांगलाच पारा वाढलेला दिसून येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक चांगलेच परेशान झालेले दिसत आहेत. सध्या मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवडयात उन्हाचे चटके असहय्य होत आहेत. त्यामुळे नागरिकांची रसवंती गृहे, शीतपेय पिण्यावर मोठी पसंती होत आहे. त्याचा परिणाम म्हणजेच उन्हाच्या या झळा चांगल्याच जाणवत असून नागरिकांना याचा मोठा त्रास होत असल्याचे चित्र परभणी जिल्हयात पहावयास मिळत आहे.


तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहिराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३


## सेलू तालुकास्तरीय शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणाचा तिसरा टप्पा पूर्ण

### --नवीन शैक्षणिक आव्हानास शिक्षक सज्ज

**शिवाजी आकात**



**सेलू :-** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने शिक्षक क्षमतावृध्दी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.या प्रशिक्षणाचा तिसरा टप्पा आज दि ०१ मार्च रोजी संपन्न झाला असून उत्कृष्ट भोजन व्यवस्थेसह इतर सुविधांनी युक्त प्रशिक्षणात शिक्षकांनी देखील मोठ्या प्रमाणावर सहभाग घेऊन येणाऱ्या नवीन शैक्षणिक आव्हानास शिक्षक मंडळी सज्ज होत आहेत.या प्रशिक्षणातून नवीन अध्ययन-अध्यापन व मूल्यमापन तंत्र अवगत करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना शिकवण्यापेक्षा शिकते करण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन जेष्ठ अधिव्याख्याता तथा प्रशिक्षणाचे तालुका समन्वयक गणेश शिंदे यांनी व्यक्त केले.या प्रसंगी गटशिक्षणाधिकारी उमेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

येथील कै. सौ. राधाबाई किशनराव कान्हेकर शारदा विद्यालयात गटसाधन केंद्राच्या वतीने सेलू तालुकास्तरीय शिक्षक क्षमतावृध्दी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले . या प्रशिक्षणाच्या तिसऱ्या टप्प्यात सुरू असलेल्या वर्गांना जेष्ठ अधिव्याख्याता प्रा.गणेश शिंदे, गटशिक्षणाधिकारी उमेश राऊत, यांनी प्रशिक्षण स्थळी भेट देऊन मार्गदर्शन केले. या वेळी तालुका प्रशिक्षण समन्वयक सुनिता काळे,अंजली पद्माकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. सलगर, जेष्ठ अधिव्याख्याता तथा प्रशिक्षण जिल्हा समन्वयक डॉ. अनिल मुरकुटे, गटशिक्षणाधिकारी उमेश राऊत,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी गजानन वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण होत . सुलभक म्हणून नवनाथ वाघमारे, गजानन शितळे, आम्रपाली खाजेकर, प्रवीण कुलकर्णी, उड़ान कंठाळे, उदयपाल सोनकांबळे, शेख मौर कृष्णा पुरणाळे, अनुजा सुभेदार, डॉ.यशवंत कुलकर्णी, गजानन कावळे, अनिल रत्नपारखी, मीरा डोळस, शिवाजी पिंपळ कर, नीलेश पांचाळ, नीलेश गडम, रवींद्र कदम आदी काम पाहत . ८ मार्च पर्यंत चार टप्प्यांत पहिली ते बारावीच्या एकूण ९२५ शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात येणार आहे, अशी माहिती समन्वयक सुनिता काळे यांनी या वेळी दिली.

प्रशिक्षणासाठी शारदा विद्यालयाचे मुख्याध्यापक दिगांबर शिंदे,सहशिक्षक सुभाष मोहकरे,बाळासाहेब साखरे,समन्वयक सुनिता काळे, अंजली पद्माकर, अरूण राऊत,मरेवार, अश्विनी आम्ले तसेच सुहास नवले, माधव गायकवाड, जनार्दन कदम, दत्ता काळे आदींसह केंद्रप्रमुख, शिक्षक व कर्मचारी परिश्रम घेत .

## १८ दिवसीय निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे आयोजन- ६ ते २३ मार्च दरम्यान होणार प्रशिक्षण

**परभणी,/प्रतिनिधी :** उद्योग संचलनालय ट शासन, मुंबई पुरस्कृत व ट उद्योजकता विकास केंद्र परभणी आयोजित आणि ट उद्योजक, व्यापार व गुंतवणूक सुलभता कक्ष (एमएआयटीआरआय) मुंबई यांच्या सहकार्याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील युवक-युवती व महिलासाठी १८ दिवसीय नि:शुल्क प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन त्र संभाजी नगर येथे ६ मार्च ते २३ मार्च या कालावधीत करण्यात आले .

या प्रशिक्षण शिबीरात गुणसंपदा, व्यक्तिमत्व विकास, बाजारपेठ पाहणी तंत्र, विविध उद्योग संघी बाबत लायसन्स व त्यासाठी लागणारे कागदपत्रे, संपर्क कशासाठी कोणाकडे मार्केट सर्व्हे, एमएसएमई नोंदणी, व्यवसायाचे व्यवस्थापन इत्यादींसह विविध उद्योगांना भेट व यशस्वी उद्योजकांचे अनुभव, विक्री कौशल्यांबाबत मागदर्शन करण्यात येणार . , ८ वी पास व त्यापुढे १८ ते ४५ वर्ष वयोगटातील युवक, युवती व महिलांनी प्रवेशासाठी व अधिक माहितीसाठी अमोल राठोड कार्यक्रम समन्वयक, मो.८२०८६४९१३१, एमसीईडीद्वारा जिल्हा उद्योग केंद्र गार्डनच्या बाजूला शिवाजी नगर परभणी येथे संपर्क साधावा. असे आवाहन एम.सी.ई.डी.चे प्रकल्प अधिकारी के.व्ही राठोड यांनी केले

## राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम २.० चे उद्घाटन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील पी.एम.श्री.केंद्रीय कन्या शाळेत शनिवारी (दि.०१) 'राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम २.०' कार्यक्रमाचे उद्घाटन ॲड. श्रीकांत विटेकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते पुणे येथे पार पडलेल्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम विशेष मोहीमेच्या उद्घाटन सोहळ्याचे लाईव्ह प्रक्षेपण दाखविण्यात आले.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष पवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विठ्ठल कराड, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रदिप गायकवाड मुख्याध्यापक केंद्रीय कन्या शाळा, अजित देशमुख, डॉ. स्वप्निल जोशी, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र शेळगाव, डॉ. भारत चव्हाण बालरोग तज्ञ, ग्रामीण रुग्णालय सोनपेठ आणि तालुक्यातील सी. एच. ओ.,आरोग्य कर्मचारी, आरोग्य सहाय्यक तथा आरबीएसके चे सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत पार पडला.

प्रास्ताविकात तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष पवार यांनी सांगितले की, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत ० ते १८ वयोगटातील शाळा व अंगणवाडी मधील सर्व बालकांची आरोग्य तपासणी केली जाते. अंगणवाडी मधील बालकांची वर्षातून दोन वेळा तपासणी केली जाते आणि शाळेतील विद्यार्थ्यांची वर्षातुन एक वेळा तपासणी केली जाते. २०१३ मध्ये सुरू झालेल्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात अतिशय उल्लेखनीय काम सोनपेठ तालुक्यातून झाले असल्याचे डॉ. पवार यांनी नमूद केले. २४ बालकांच्या हृदयाच्या शस्त्रक्रिया आणि १४२ बालकांवरील इतर किरकोळ शस्त्रक्रिया ज्यामध्ये वाचा दोष निवारण, हर्निया, अपेंडीक्स सारख्या शस्त्रक्रिया पूर्णतः मोफत करण्यात आल्या, असे सांगितले. त्यामुळे आर. बी. एस. के. चे वैद्यकीय अधिकारी डॉ. मृदुला देशमुख, डॉ. मन्मथ महाजन, डॉ. बालाजी इप्पर यांचे कार्य कौतुकास्पद आहे.

## पूर्णेत श्री संत गुरु रविदास महाराज व श्री कक्कया महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

### ...समाज संघटित झाल्यानंतर समाजाची प्रगती होते - माधव गायकवाड

**संपत तेली**

**पूर्णा ,/प्रतिनिधी-** शहरात श्री संत शिरोमणी गुरु रविदास महाराज व कक्कया महाराज यांची जयंती २८ फेब्रुवारी रोजी शहरातील ज्ञानेश्वरी विद्या मंदिर परिसर गवळी गल्ली येथे चर्मकार समाज बांधव व राष्ट्रीय चर्मकार महा संघ पूर्णा च्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

शहरातील सर्व महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून जयंती सुरुवात करण्यात आली. त्यावेळी स्वागतध्यक्ष म्हणून रा.च.म. प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड,उदघाटक विदर्भ अध्यक्ष संबा वाघमारे.प्रमुख पाहुणे हिंगोली जिल्हा अध्यक्ष मनिषा गायकवाड, महादू ठोंबरे,



मुरलीधर ठोंबरे,वक्ते प्रा.विष्णू असोरे, विनोद असोरे, मुरलीधर ठोंबरे, रामकिशन कांबळे,प्रकाश फुलपगार, अँड हर्षवर्धन गायकवाड, दादाराव पंडित, तुषार गायकवाड, दीपक रणवीर डॉ. चंद्रभान गंगासागरे डॉ. नागनाथ झुंजारे डॉ.भाग्यवंत,रामकिशन कांबळे, नरहरी सोनवणे,चांदोजी कांबळे आदी मान्यवर उपस्थित . स्वागताध्यक्ष आपल्या भाषणात संत रोहिदास महाराज यांचे १४० देशांमध्ये मंदिर आहेत व सर्व समाज संघटित झाल्यानंतर समाजाची प्रगती कोणीही रोखू शकत नाही आपल्या जीवनामध्ये महापुरुषांची विचार मनात घेऊन कार्य केल्यास यशप्राप्ती होते असे बोलत होते . शहरातील गटई काम करणाऱ्या कामगारांना विदर्भ अध्यक्ष संभा वाघमारे यांच्या हस्ते गटई किट व छत्री वाटप करण्यात आली त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुभाष सूर्यवंशी होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन असोरे तर प्रास्ताविक राष्ट्रीय चर्मकार महासंघ पूर्णा तालुका अध्यक्ष अमोल गायकवाड यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती अध्यक्ष, सुशील गायकवाड, कार्याध्यक्ष सुशीलकुमार दळवी,बबन अन्नपूर्णे, पुरभाजी असोरे, हरी असोरे, शंकरराव जोगदंड, , अनिल नारायणकर, दीपक जोनवाल, लक्ष्मण परसुते, मुंजाजी असोरे, विकास गायकवाड,गजानन सूर्यवंशी, डॉ. नागनाथ, जुजारे,, रवि हराळे न्यानु असोरे , हरी जोगदंड, रोहिदास जोगदंड, धनराज आसुरे आदींनी परिश्रम घेतले यांनी केले.

## जिंतूरात महावितरण कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष

**जिंतूर,/प्रतिनिधी :** येथील जालना रोडवरील शिंदे यांचे पेट्रोल पंप समोरील डीपीची अत्यंत बिकट अवस्था असून याकडे महावितरण कर्मचारी जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांना मोठा प्रश्न निर्माण झाला आहे सदरची डीपी दुरुस्ती करून देण्याची मागणी नागरिक करीत आहे

जालना रोडवरील दुकानदार व्यवसायिक व नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे व सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू झाल्याने नागरिक हैरान झाले असून डीपी वरील वायर फ्युज जळून काळे पडले आहे तरी या डीपीची दुरुस्ती होत नाही या डीपीचे साधे फ्युज गेले तर फ्युज कॉल वरील कर्मचारी वारंवार फोन करून फ्युज टाकायला सुद्धा येत नाही ही एक मोठी शोकांतिका आहे याकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष देण्याची मागणी परिसरातील नागरिक करीत आहे.



## तंत्रज्ञानाचा वापर मानवी जीवनाच्या उन्नतीसाठी करा

## डॉ. अंबादास कदम : शारदा महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**परभणी,/प्रतिनिधी:** विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर विपरीत न करता मानवी जीवनाच्या व स्वतःच्या उन्नतीसाठी करावा, पर्यावरणीय जीवनशैलीचा स्वीकार करून जीवन जगले तरच भविष्यातील संकटाना सामोरे जाता येईल, असे मतप्रा. डॉ. अंबादास कदम यांनी व्यक्त केले.

येथील शारदा महाविद्यालयात वनस्पती शास्त्र विभागाच्या वतीने शुक्रवार २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. बबन पवार, उद्घाटक म्हणून अधिसभा सदस्य प्रा. डॉ. अंबादास कदम तर प्रमुख अतिथी तथा परीक्षक म्हणून बी. रघुनाथ कॉलेजचे प्रा. डॉ. . . खोले, श्री. शिवाजी कॉलेजचे प्रा. डॉ. जी. बी. गुंडलेवार उपस्थित . यावेळी व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. संतोष नाकाडे, कार्यक्रमाच्या संयोजक प्रा. डॉ. सौ. अंजली शिंदे व विज्ञान शाखा प्रमुख प्रा. डॉ. बी.आर.पाटील उपस्थित .

यावेळी सायमा फातेमा, गौस खान, सोहेल समीर, महेबीन फातेमा या विद्यार्थ्यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. बबन पवार यांनी पर्यावरण विषयावरील स्पर्धेमध्ये उस्फुर्त सहभाग घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करत, मानवी जीवनात तंत्रज्ञनाने प्रचंड प्रगती केली असून याचा वापर जर दृष्टेपणाने केला तर स्वत:बरोबर देशाचेही हित साधता येते असे मत प्रतिपादन केले.

यावेळी सायमा फातेमा, गौस खान, सोहेल समीर, महेबीन फातेमा या विद्यार्थ्यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. बबन पवार यांनी पर्यावरण विषयावरील स्पर्धेमध्ये उस्फुर्त सहभाग घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करत, मानवी जीवनात तंत्रज्ञनाने प्रचंड प्रगती केली असून याचा वापर जर दृष्टेपणाने केला तर स्वत:बरोबर देशाचेही हित साधता येते असे मत प्रतिपादन केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# थकीत वेतनासाठी कामगारांचे वन कार्यालयासमोर उपोषण

## मागील सात महिन्यांपासून कामगारांना वेतन मिळाले नाही



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मार्च**

येथील वन विभागात काम करणाऱ्या महिला कामगारांना मागील सात ते आठ महिन्यांपासून थकीत वेतन मिळाले नाही. वन विभागाकडे वेळोवेळी मागणी करूनही वेतन न मिळाल्याने मराठवाडा श्रमिक संघटनेच्या नेतृत्वाखाली येथील विभागीय वनाधिकारी कार्यालयासमोर दि ३ मार्च पासून बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले. यावेळी कामगारांनी जोरदार निदर्शने केली.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, हिंगोली जिल्ह्यातील सर्व रोजंदारी कामगारांना त्यांचे मागील ३ ते ७ महिन्यांपासून वेतन मिळाले नाही. त्यामुळे कामगारांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. संबंधित वनअधिकाऱ्यांकडे कामगारांनी मागणी केली असता निधी आला नाही. वरिष्ठांकडून निधी आला की देण्यात येईल अशी बनवाबनवी उत्तरे कामगारांना देण्यात येत आहेत.

कामगारांच्या रोजंदारी दरात सुधारणा करून तयप्रमाणे मागील फरक देण्यात यावा. त्याची अंमलबजावणी सप्टेंबर २०२४ पासून करण्यात यावी. रोजंदारी कामगारांना सेवेत नियमित करण्यासाठी शासनाला पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत संघटनेला देण्यात यावी, तसेच पेन्शनरला थकीत रक्कम तसेच मयताच्या वारसाला पेन्शन व इतर आर्थिक लाभ देण्यात यावेत, रोजंदारीत काम करणाऱ्या सर्व कामगारांची एक सेवा ज्येष्ठता यादी तयार करावी आणि त्याची एक प्रत संघटनेला पुरवावी, रोजंदारी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे हजेरी कार्ड, वेतनस्लीप, ओळखपत्र देण्यात यावे आदी मागण्यांचा समावेश आहे.

या आंदोलनात संधटनेचे सहचिटणीस उध्दव शिंदे, संजीवनी कुन्हे, आफसाना कासीम, चंदाबाई खिल्लारे, द्वारकाबाई मनवर, रेखा रणवीर, कुसुमबाई कांबळे, गंगासागर दिपके, कौशल्याबाई दांडेकर, शोभा दुधमल, बबीता कांबळे, ललीता कांबळे, रिहाना शग्गु, करूणा खंदारे, मीना खंडागळे, बळीराम दिवे, दत्ता जाधव, सीताराम राठोर, संजय सुर्यवंशी, सीताबाई खुने, लोचना खुने, सुमित्रा देशमुख, आशा पोहकर, सारीका खुने,

# ग्रामीण पोलिसांची नियमबाह्य डीजे वाजविणाऱ्यावर कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मार्च**

शहरानजीक असलेल्या बळसोंड भागात संस्कार टॉकीज ते रिलायन्स पेट्रोलपंपजवळ हिंगोली ते अकोला या मुख्य रस्तावर वाहतुकीस अडथळा करीत तसेच नियमबाह्य पध्दतीने ध्वनीप्रदुषण करणाऱ्या वाशिम येथील एका डीजे चालकावर हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक डोंगरे यांनी कारवाई केली आहे.

आगामी सण आणि उत्सवात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शांततेत सण, उत्सव साजरे करण्याचे आवाहन केले आहे तसेच मिरवणुकीत नियमबाह्य पध्दतीने डीजे लावून समाजास धातक होईल अशा प्रकारचे कोणतेही कृत्य केल्यास कारवाईचा इशारा दिला आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यात सर्व पोलिस ठाण्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत शहरानजीक बळसोंड भागातील संस्कार टॉकीज ते रिलायन्स पेट्रोलपंप दि २ मार्च रोजी रात्री १०.१५ वाजता टाटा ४०७ एलपीडी टेम्पो वाहन क्रमांक एमएच ३७ बी १४९८ या वाहनात सार्वजनिक रस्त्याच्या मध्यभागी उभा करून रस्त्यावरील ये-जा करणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण करून लोकांच्या जीवीतास धोका निर्माण होईल असे उभा केल्याचे ग्रामीण पोलीसांच्या पथकाच्या निदर्शनास आले. तसेच वाहनांवर डीजे साऊंड लावून मोठमोठ्या आवाजात गाणे वाजवून सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे उल्लंघन करतांना आढळून आले. ग्रामीण पोलिसांनी उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना पाचारण केले असून संबंधित वाहनांवर कारवाई करण्यात आली. याप्रकरणी चालक विनोद संजय जाधव वय २७ रा धुमका जि वाशिम याच्याविरोधात ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी डीजेसह वाहन जप्त केले आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक डोंगरे, बाळासाहेब खोडवे, सपोउपनि घुमनर हे करीत आहेत.

# २२७ मोतीबिंदु रूग्णांची तपासणी, ४७ वर शस्त्रक्रिया



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मार्च**

ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑप बँक नवीन इमारतीचे उद्घाटन आणि स्व ओमप्रकाश देवडा यांच्या १० पुण्यतिथीनिमित्त पिपल्स बँक आणि लॉयन्स नेत्र रूग्णालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबीरात २२७ जणांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. यावेळी ४७ मोतीबिंदू रूग्ण आढळले त्यांना रूग्णवाहीकेद्वारे नांदेडला पाठविण्यात आले असून त्यांच्यावर मोतीबिंदु शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या शिबीराचे उद्घाटन बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष सुनील देवडा, डॉ सचिन बगडीया, संचालक विठ्ठलदास मुंदडा, शशीकांत दोडल, ज्ञानेश्वर मामडे, संजय देवडा, राजेश अग्रवाल, आशिष काबरा, अग्रवाल महिला मंडळाच्या अंजू देवडा, नितू देवडा, शीला देवडा, कविता अग्रवाल, संगीता कयाल आदींची उपस्थिती होती.

या शिबीर समितीचे नंदकिशोर भालेराव, शशीकांत कंदी, आशिष पिंगळकर, संजय बोहरा, दयाल यादव, अभिषेक राऊत, मोहनीश चव्हाण, सुमित दुबे, ऋषीकेश पांचाळ, रवी गरड, दिपक टापरे, संस्कृती पिंगरर यांनी नियोजन व परिश्रम घेतले. दि ४ मार्च रोजी कर्करोग तपासणी, उपचार व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.



**हिंगोली– येथील ओमप्रकाश देवडा पिपल्स बँकेच्या नवीन इमारतीमध्ये अर्बन बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे एक दिवशीय प्रशिक्षणाचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. यावेळी डॉ अभय मंडलीक, दिलीप वेल्हाणकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, उपाध्यक्ष सुनील देवडा, सहकार भारतीचे डॉ किशोर मंत्री यांच्यासह हिंगोली, परभणी येथील बँकाचे पदाधिकारी उपस्थित होते. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### शिवाजी महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा



हिंगोली– येथील शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. दरवर्षी २८ फेब्रुवारी ला हा विज्ञान दिवस साजरा करण्यात येतो. भारतीय शास्त्रज्ञ सी. व्ही. रमण यांनी रामन प्रभाव शोधला. हा शोध बद्दल त्यांना १९३० मध्ये भोतिकशास्त्र विषयातील नोबेल पुरस्कार मिळाला.रामन प्रभाव म्हणजे प्रकाशाच्या कनाचा पदार्थच्या अनुसोबत संवाद साधून प्रकाशाच्या लहरीच्या रंगामध्ये होणारा बद्दल होय. या शोधामुळे रमण यांना जागतिक स्तरावर ओळख निर्माण निर्माण केली. यावेळी महाविद्यालयाचे अधीक्षक उत्तम जाधव, प्रा. डॉ किशोर इंगोले, डॉ. गणपत पवार,प्रा. देवानंद येवले प्रा. प्रकाश पिंजन, प्रा. तुकाराम चौतमल, प्रा. बळीराम शिंदे, प्रा. संजय चव्हाण, प्रा. सतीश मोरे, प्रा. मानकेश्वर गलांडे, प्रा. शिवदास राऊत, प्रा. अनिल परसवाळे, प्रा. प्रियंका पवार, प्रा. आशिष इंगळे,प्रा. निलम काळे,प्रा. धाराशिव शिराळे, प्रा. दीक्षित इंगोले श्री विजय पवार,श्री बंडू महाडिक श्री सुभाष जरे इत्यादी उपस्थित होते.

### कनेरगाव येथे रक्तदान शिबीर



हिंगोली– कनेरगांव नाका येथील पैनगंगा नदीपात्रात असलेले श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान येथे शासकीय रक्तपेढी जिल्हा सामान्य रुग्णालय हिंगोली यांच्या वतीने व १०८ रुद्राक्ष माला ग्रुप यांच्या मार्फत आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ. नामदेव कोरडे, दिलीप घ्यार, प्रल्हाद गिरी, सरपंच मनोज सोळंके उपस्थित होते. या आरोग्य शिबिरात डॉ दिपाली पतंगे, डॉ. रवी शेवाळे, मनिषा साठे, संतोष ठाकरे, वैभव मुटकुळे प्रयोगशाळा तंत्रज्ञ व इतर स्टाफ उपस्थित होते. या शिबिरात ११ रक्तदात्यांनी रक्तदान केले व १०८ रुग्णांनी आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला. याशिबिरासाठी श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान १०८ रुद्राक्ष माला ग्रुपचे रुपेश सोळंके, राधेश्याम बाहेती प्रविण चव्हाण, माजी सरपंच गणेश मानदा, हनुमान गावंडे आदींनी परिश्रम घेतले.

# शिरडशहापूर येथील कराटे खेळाडूंचे यश



**तभा वृत्तसेवा**
**शिरड शहापूर, ३ मार्च**

नेहरू युवा केंद्र भारत सरकार ,अजिंक्य मानव विकास प्रतिष्ठान, हिंगोली जिल्हा स्पोर्टस् कराटे डो असोशिएशन यांच्या संयुक्त विदयमाने रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रीय संत गाडगेबाबा यांच्या जयंती, जागतिक महीला दिनानिमित्त ओपन कराटे चॅम्मीयनशिपचे आयोजन अमाविप्रचे अध्यक्ष संतोष नांगरे यांनी युथ अधिकरी अशिष पंत यांच्या मार्गदर्शना खाली केले होते. ही स्पर्धा हु .बहीर्जी स्मारक महाविदयालयाच्या इनडोअर सभागृहात कराटे चॅम्पीयनशिप संपन्न झाली. शिरडशहापुर येथील कराटे प्रशिक्षक अनिल टाकणखार यांच्या मार्गदर्शनानुसार येथील खेळाडुंनी सदर चम्पीयनशिपमध्ये सहभाग नोंदवुन नेत्रदिपक कामगिरी केली त्यात शशांक सारसकर, अनुष्का आडाणे यांनी सुवर्णपद मिळवले. दिव्या घुगे, आदित्य उबाळे, निधी पवार, वेदांत दुधाळकर, यांनी कांस्य पदक मिळवुन यश संपादन केले. त्यांचे गावातील प्रतिष्ठीत नागरीक क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी कौतुक केले.

# हिंगोलीसह वसमत, कळमनुरी बस आगारात सीसीटीव्ही कॅमेरेच नाहीत, सुरक्षा रामभरोसे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मार्च**

हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली आगारात सीसीटीव्ही बंद अवस्थेत तर वसमत आणि कळमनुरी बस आगारात सीसीटीव्ही कॅमेरेच नसल्याचे दिसत असून सुरक्षेच्या दृष्टीने तीनही आगार रामभरोसेच असल्याचे दिसत आहे.

हिंगोली येथील जिल्ह्याचे ठिकाणी असलेले मध्यवर्ती बसस्थानकाचे मागील तीन वर्षापूर्वी उद्घाटन झाले. यावेळी सदरील इमारतीच्या बांधकामासाठी कोट्यावधी रूपये खर्च करण्यात आले. नवीन इमारत बांधण्यात आली परंतु या बसस्थानकात अजूनही सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले नाही वारंवार या संबंधी वृत्त प्रकाशित करूनही बस आगार प्रमुख, प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. विदर्भ, मराठवाडासह पश्चिम महाराष्ट्रात येथून शेकडो प्रवाशी प्रवार करीत असतात. अनेकवेळा महिलांचे गळ्यातील दागिने, पर्स, पाकीटमारी अशा घटना घडतात परंतु बस स्थानकातील सुरक्षा रामभरोसेच आहे. बस स्थानकात सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. बस स्थानकात टवाळखोर मुले दररोज ग्रामीण भागातून शाळा, महाविद्यालयात येजा करणाऱ्या मुलींचा पाठलाग करीत असतात तसेच काहीजण बसस्थानक परिसरात दुचाकीचे स्टंट करीत असतांना दिसतात. काही टवाळखोरे चक्क मुलींना दुचाकीवर बसवून बसस्थानकातून नेत असतांनाच्या घटनाही घडतात. त्यामुळे महिला आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बसस्थानकात पिण्याचे पाणी देखील प्रवाशांना उपलब्ध नाहीत.

या तीनही आगारातून पुणे, नाशिक, मुंबई, सोलापूर, हैद्राबाद, नागपूर अशा लांबपल्ल्याच्या बसगाड्या सोडण्यात येतात. रात्री उशिरापर्यंत बसेस चालूच असतात. हिंगोली आगारात चार वॉचमन आहेत. हे कर्मचारी आठ तासांच्या शिफ्टनुसार काम करतात. स्वार गेट येथील घटनेनंतर बसस्थानकात आता महिला सुरक्षा रक्षक आणि पुरूष सुरक्षा रक्षक दितस आहेत. रात्री दहानंतर बसस्थानकात वॉचमन नसतात. येथील सीसीटीव्ही बंद अवस्थेत आहेत.

कळमनुरी आगारातून ३५ बसेस सोडल्या जातात या ठिकाणी चार सुरक्षा रक्षक आहेत मात्र सीसीटीव्ही नाहीत. पोलिस चौकी आहे परंतु पोलिस कर्मचारी क्वचीतच दिसतात.

वसमत आगारातून ५४ बसेस सोडण्यात येत असून या आगारात सुरक्षेसाठी तीन कर्मचारी आहेत. सध्या नवीन बसस्थानकाच्या इमारतीचे काम सुरू आहे. त्यामुळे या ठिकाणी वाढीव सुरक्षा कर्मचारी आवश्यक आहे मात्र त्याकडे दुर्लक्ष होत आहे.

# अ.भा. भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीची बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ मार्चे**

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती ब्रिक्स ह्युमन राईट्स मिशनची नांदेड, परभणी, हिंगोली विभागातील सर्व महिला, पुरुष, युवा, युवती पदाधिकारी आढावा बैठक येथील शासकीय विश्रामगृहात पार पडली. या बैठकीस प्रदेशाध्यक्ष पंडितराव तिडके, राष्ट्रीय सरचिटणीस राजू पाटील सिंपाळकर, प्रदेश कार्याध्यक्ष रामदास गिरे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष अमरजीत सिंग कॉलरा, विभागीय अध्यक्ष शंकरराव देशमुख यांची उपस्थिती होती. या बैठकीत मागील कार्याचा आढावा घेण्यात आला. त्याचबरोबर नवीन पदाधिकाऱ्यांचं पदोन्नती तसेच निवड करण्यात आली. ८ आणि ९ मार्च रोजी राजवड जिल्हा जळगाव येथे होणारे २ दिवस अभ्यास शिबिर संदर्भात आढावा घेण्यात आला. पदाधिकाऱ्यांना येत असलेल्या अडचणी व त्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विभागीय अध्यक्षा स्वराताई मराठे, जिल्हाध्यक्ष हिंगोली बालाजी वानखेडे, जिल्हाध्यक्ष परभणी अनंत कचाले, जिल्हाध्यक्ष नांदेड शंकरजी मावलगे, जिल्हाध्यक्ष नांदेड गजानन गव्हाणे, जिल्हाध्यक्षा हिंगोली वंदनाताई थिटे, जिल्हाध्यक्षा परभणी रेखाताई मनरे, जिल्हाध्यक्षा हिंगोली ब्रिक्स ह्युमन राईट सुवर्णाताई आकमार, जिल्हा अध्यक्षा युवती अँड अलकाताई साळवे, हिंगोली मराठवाडा संघटक सचिन दराडे, गजानन टेकाळे, आकले मामा, जावेद अन्सारी, प्रभाकर भिसडे आदींची उपस्थिती होती.

यावेळी नियुक्त्या करण्यात आल्या. त्यामध्ये विभागीय युवा अध्यक्ष अनिल वैजनाथ लोंढे, युवा जिल्हाध्यक्ष विठ्ठल रामचंद्र धाकतोडे, मुख्य जिल्हा संघटक बाळासाहेब रामजी बोंगाणे, जिल्हा उपाध्यक्ष आनंद लक्ष्मण खरे, वसमत तालुकाध्यक्ष भगवान शिवभगत, हिंगोली तालुका उपाध्यक्ष गजानन मुटकुळे यांचा समावेश आहे. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# तौफीक, ताखीब, उस्मान, उमर यांचा पहिला रोजा



**तभा वृत्तसेवा**
**शिरड शहापूर, ३ मार्चे**

पवित्र रमजान रोजांच महिना सुरू असून, इस्लाम धर्मात पवित्र रमजान महिन्यातील आपल्या जीवनातील पहिला रोजाला विशेष महत्त्व असते. शिरडशहापूर येथील तोफिकखान वय ११ वर्ष, ताखीबखान वय ९ वर्ष, उस्मानखान वय १० वर्ष, उमरखान वय १० वर्ष यांनी २ मार्च रोजी रविवारी आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण केला आहे. प्रथम रोज पूर्ण केल्याबद्दल जमीलखान, शेख हारून, समीउल्लाखान, सोहेलखान, सय्यद मुजाहिद,महबूबखान,शेख अफरोज, शेख उबेद, काशीफ, अहमदखान, कंदी, आकमार, निखिल लुटे, तनवीरखानआदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# न्याय मिळवून देण्यासाठी महादेव मुंडेंच्या पत्नीचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत अमरण उपोषण सुरू



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ मार्च**

परळी येथील बँक कॉलनीतील पिग्मी एजंट महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणास १६ महिने उलटले असताना ही मारेकरी मोकाटच आहेत. या प्रकरणातील आरोपींना लवकरात लवकर अटक करावी या मागणीसाठी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे व मुंडे परिवाराच्या वतीने आजपासून (दि.३) बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत अमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

महादेव मुंडे यांचा तीक्ष्ण हत्याराने खून करून त्यांचा मृतदेह परळीच्या तहसील कार्यालयासमोरील जागेत २२ ऑक्टोबर २०२३ रोजी आढळून आला. याप्रकरणी २२ ऑक्टोबर रोजी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणी अद्यापही एका आरोपीसही अटक करण्यात आलेले नाही. १६ महिन्यानंतरही आरोपी अटक नसल्याने ज्ञानेश्वरी मुंडे यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबविण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे, आष्टीचे भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी ज्ञानेश्वरी मुंडे यांची भेट घेतली व मुंडे कुटुंबाचे सांत्वन केले.

दरम्यान, न्यायासाठी गेल्या काही दिवसापूर्वी ज्ञानेश्वर मुंडे या उपोषण करणार होत्या परंतु त्यांना विनंती करण्यात आल्याने त्यांनी उपोषण लांबणीवर टाकले होते. पोलिसांनी अद्याप आरोपीला अटक न केल्याने ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आज ३ मार्चपासून बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आज सकाळपासून महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे, महादेव मुंडे यांचे वडील दत्तात्रय मुंडे, तसेच गोविंदराव फड, भगवान फड सतीश फड, तुळसाबाई फड, छाया फड यांच्यासह कन्हेरवाडी, भोपळा येथील नातेवाईक सहभागी झाले आहेत.

# गोवंश रक्षणासाठीच्या सुधारित कायद्यासंदर्भात चर्चा

## गोवंशाचे रक्षण;पुण्यात ना.पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत कायदेतज्ज्ञांचे चर्चासत्र

### महापशूधन हेल्पलाईन सेंटरचेही केले उदघाटन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ मार्च**

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज पुण्यात पशुसंवर्धन विभागा अंतर्गत गोवंश रक्षण आणि संवर्धन कायद्याबाबत एक दिवसीय चर्चासत्र पार पडले. कायद्यात करण्यात येणाऱ्या सुधारणांविषयी त्यांनी कायदेतज्ज्ञ आणि अधिवक्त्यांशी यावेळी संवाद साधला.

महाराष्ट्र गोसेवा आयोग आणि पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गोवशांचे रक्षण आणि संवर्धन कायदा संदर्भात राज्यातील प्रमुख कायदेतज्ज्ञ अधिवक्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत औंध येथे एक दिवसीय चर्चा



सत्र पार पडले.राज्यातील गोवंशाचे रक्षण आणि संवर्धनाबाबत माहिती जाणून घेत ना. पंकजाताईंनी याबाबतचे कायदे व त्यात करण्यात येणाऱ्या नवीन सुधारणा याबद्दल कायदे तज्ज्ञांच्या सोबत संवाद साधला.

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश अंबादास जोशी, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, विश्वहिंदू परिषदेचे कृष्णकांतजी कुदळे तसेच पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या मुख्यालयास त्यांनी सदिच्छा भेट दिली.पशुवैद्यकीय विभागाने शेतकऱ्यांना घरपोच सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या हेल्पलाईन सेंटरचे उद्घाटन ना.पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.१९६२ महापशुधन संजीवनी या हेल्पलाईन मुळे शेतकरी बांधवांना आपल्या पशुधनांसाठी घरपोच वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. यावेळी सुपर स्पेशालिटी पशुवैद्यकीय हॉस्पीटल आणि बायो सेक्युरीटी आयव्हीबीपी लॅबला त्यांनी भेट देऊन कामकाजाची पाहणी केली.

# समीक्षा क्षेत्रामध्ये वा.ल.कुलकर्णी यांचे मोठे योगदान-प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ मार्च**

नियतकालिके, कथा, कादंबरीच्या समीक्षेमध्ये वा.ल. कुलकर्णी यांचे मोठे योगदान आहे असे प्रतिपादन प्राचार्य सदाशिव सरकटे यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि



स्वा.सावरकर महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वा.ल. कुलकर्णी व्याख्यानमालेच्या प्रथम पुष्प गुंफताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो.डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर हे होते, तर व्यासपीठावर उपप्राचार्य प्रो.डॉ.उत्तम साळवे, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. तात्याराम सोंडगे, उपस्थित होते.पुढे बोलताना डॉ. सरकटे म्हणाले की वा.ल.कुलकर्णी हे आपल्या विद्यापीठाचे पहिले विभाग प्रमुख होते कविता, कथा, नाटक, कादंबरी या क्षेत्रात त्यांनी मोठे योगदान दिले. विद्यापीठाचे नाव मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले. अध्यक्षीय समारोपात डॉ. लक्ष्मीकांत बाहेरगव्हाणकर यांनी वा.ल. कुलकर्णी यांचे योगदान सांगितले.

प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. सोपान सुरवसे यांनी केले.दि.२ मार्च २०२५ रोजी वा.ल.कुलकर्णी व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी या विषयावर संपन्न झाले. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून बलभीम मविद्यालय, बीड येथील मराठी विभाग प्रमुख प्रो.डॉ.मनोहर सिरसाट यांनी मराठी भाषेचा विकास कोणकोणत्या कालखंडामध्ये कोणत्या स्वरूपात झाला या विषयी विवेचन केले.

पुढे बोलताना डॉ. मनोहर सिरसाट म्हणाले की वर्तमान समाज व्यवस्थेमध्ये मराठी ही अभिजात भाषा असून ती ज्ञानभाषा झाली पाहिजे. मराठी विषय घेऊन अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या विपुल संधी उपलब्ध आहेत. केवळ समाज माध्यमांचा जर विचार केला तरी मुद्रित माध्यमांमध्ये वृत्तपत्र व्यवसायात संपादक, मुद्रितशोधक, वार्ताहर, या क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी आहेत. मानवी जीवनाला व्यापणारी सर्वच क्षेत्रे आज मराठीने व्यापून टाकलेले आहेत त्यामुळे मराठी विषय घेऊन समाजामध्ये वावरणारा विद्यार्थी बदलत्या काळात देखील सक्षमपणे रोजगार उपलब्ध झाल्यानंतर समाजाच्या विकासाला हातभार लावेल हे निश्चितच आहे. या दुसऱ्या पुष्पासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो.डॉ.उत्तम साळवे हे उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप सत्रात बोलताना साळवे सर म्हणाले की व्यक्तीच्या भाषिक विकास झाला की खऱ्या अर्थाने त्याला नोकरी आणि रोजगार या संधी आपोआपच चालवून येणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राम गव्हाणे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# मस्साजोग ते बीड सदभावना पदयात्रा जातीय सलोख्यासाठी काँग्रेसचा पुढाकार

**८-९ मार्च रोजी पदयात्रा; धारूरमध्ये नियोजन बैठक**

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.३ मार्च**

बीड जिल्ह्यात जातीय सलोखा कायम राखण्यासाठी काँग्रेसने ८ आणि ९ मार्च रोजी मस्साजोग ते बीड अशी दोन दिवसीय सदभावना पदयात्रा आयोजित केली आहे. या पदयात्रेच्या नियोजनासाठी ३ मार्च रोजी किल्ले धारूर येथील राहुल हॉटेलमध्ये बैठक झाली.



युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील, तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर रणदिवे , ज्येष्ठ नेते अंजनढव, सुबराव सोळुके, आवेज कुरेशी, नितीन मिश्रा, उत्तमराव ढगे, शेख शाफिक, यांच्यासह विविध पक्षांचे कार्यकर्ते आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्ह्यात सुरू असलेल्या जातीय तणावाच्या पार्श्वभूमीवर ही पदयात्रा काढण्यात येत असल्याचे राहुल सोनवणे यांनी सांगितले. गेल्या ८० दिवसांपासून बीड जिल्हा चर्चेत आहे. समाजात जाती-जातींमध्ये फूट पडत आहे. हे थांबवण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ आणि खासदार रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही पदयात्रा काढण्यात येत आहे, असे ते म्हणाले.

युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील यांनीही जातीय सलोख्याचे महत्त्व विशद केले. जिल्ह्यात जातीयवाद वाढला आहे. तो थांबवण्यासाठी सर्व जाती-धर्माच्या लोकांनी या पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीच्या सुरुवातीला कै. संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्राचार्य विजय शिनगारे यांनी सूत्रसंचालन केले, तर सोळंके यांनी आभार मानले.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयासमोर गतीरोधकाची मागणी: विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न

**राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ वर अपघाताची भीती**

**तभा वृत्तसेवा**
**धारूर दि.३ मार्च**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ वरील राजमाता जिजाऊ महाविद्यालयासमोर गतीरोधक (स्पीडब्रेकर) बसवण्याची मागणी महाविद्यालयाच्या प्रशासनाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे केली आहे. महाविद्यालयात सुमारे १५०० विद्यार्थी शिक्षण घेत असून, रस्त्यावरील वाढत्या वाहतुकीमुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, जालना यांना पत्र पाठवून या समस्येकडे लक्ष वेधले आहे. महाविद्यालयाच्या केज रोडवरील प्रवेशद्वारासमोरून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ जातो. हा महामार्ग असल्याने वाहनांचा वेग खूप जास्त असतो. त्यामुळे विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना रस्ता ओलांडणे धोक्याचे झाले आहे. या ठिकाणी अनेकदा लहान-मोठे अपघात झाले आहेत.

महाविद्यालयात मोठ्या संख्येने विद्यार्थी येत-जात असतात. रस्त्यावर वाहनांची वर्दळ खूप असल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी महाविद्यालयासमोर गतीरोधक बसवणे आवश्यक आहे.

# अपयशात दडले आहे यशाचे सूत्र – सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ मार्च**

पालक आपल्या मुलांना फक्त यशाला सामोरे जायला शिकवितात परंतु, अपयश आले तर काय..? याची मात्र तयारी त्यांच्याकडून करून घेत नाहीत त्यामुळे ज्यावेळी विद्यार्थ्यांना अपयश येते ते स्वीकारण्याची आणि पचविण्याची त्यांची मानसिकता नसते त्यामुळे विद्यार्थी निराशेच्या गर्तेत जाऊन त्यांचा आत्मविश्वास खचतो. त्यामुळे यशस्वी झालेल्या लोकांच्या कथा वाचण्यापेक्षा अपयशाच्या कथा वाचल्या पाहिजेत. कारण, अपयशाचे हेच अनुभव त्या विद्यार्थ्याला यश कसे मिळवावे याचे सूत्र शिकवितात असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी केले.




येथील संजीवन एज्युकेशन सोसायटीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ऍम्पाच्या अध्यक्षा डॉ.सुलभा पाटील, डॉ.सागर कुलकर्णी, ऍड.संतोष पवार, संस्थेच्या सचिव डॉ.योगिनी नागरगोजे, संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर नागरगोजे, मुख्याध्यापक शेख मुक्तार व जयराम विघ्ने महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.इंगोले यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येक पालक सजग झाला आहे. पालकाला आपला पाल्य ह्या गुणांच्या जीवघेण्या स्पर्धेत सर्वात पुढे असावा ही अपेक्षा असते किंबहुना आपली राहिलेली अपुरी स्वप्ने, इच्छा, आकांक्षा ते बळजबरीने विद्यार्थ्यांवर लादण्याचा प्रयत्न करतात. हे अपेक्षांचं ओझच आपल्या पाल्याला कळत नकळत कमकुवत बनवत आहेत याची जाणीव पालकांना नसते. या अपेक्षा त्यांच्यावर लादण्यापेक्षा त्यांच्याशी संवाद वाढवला, त्यांच्यातील सुप्तगुणांना हेरले, त्याचा कल कुणीकडे आहे हे तपासले, त्याचा आवडीचा विषय आणि भविष्यातील करीयर याचा जर ताळमेळ पालकांना राखता आला तर आपला पाल्य निश्चितपणे त्याच्या आवडीच्या क्षेत्रात यशाचे शिखर गाठू शकतो. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच माणुसकीचे संस्कार आणि मूल्य दिले तरच त्या शिक्षणाला अर्थ प्राप्त होतो अन्यथा ते शिक्षण मूल्यहीन असले तर त्याचा त्या व्यक्तीला, कुटुंबाला, समाजाला, राष्ट्राला कसलाच उपयोग होत नाही. सध्याचे शिक्षण हे नौकरी केंद्रित असल्याने ही खंत व्यक्त करीत आणि सध्या जे बदल शिक्षण क्षेत्रात होत आहेत त्याचा समाजावर आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विपरीत दूरगामी परिणाम होणार असल्याचे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. सध्याची सामाजीक परिस्थिती ही दुर्दैवी असल्याची खंत व्यक्त करीत जाती, धर्म, गरीब, श्रीमंत ही दरी समाजामध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेवर याचा वाईट परिणाम होत आहे त्यामुळे माणूस माणसाला जोडणारी संविधानाप्रति आदर ठेवणारी शिक्षण प्रणाली ही काळाची गरज असल्याचे मत डॉ.राजेश इंगोले यांनी मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.योगिनी नागरगोजे यांनी करतांना संस्था ही समाजातील सर्वस्तरांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करत आहे. या शिक्षणासोबतच हे विद्यार्थी माणूस म्हणून घडले पाहिजेत याकडे संस्था कटाक्षाने लक्ष देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करून अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी प्रयत्न करते असे सांगितले. डॉ.सागर कुलकर्णी यांनी विद्यार्थी, शिक्षक आणि पालक हे तीन चाके असून यातल्या एकाही चाकाने व्यवस्थित कार्य केले नाही. तर आयुष्याची गाडी व्यवस्थित चालणार नाही असे सूतोवाच करीत पालकाने आपल्या पाल्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे असे मत मांडले. यावेळी ऍड.संतोष पवार यांनीही विद्यार्थ्यांनी शिकून मोठे होऊन आपणही समाजाचे राष्ट्राचे देणे लागतोत या भावनेने उपेक्षित आणि गरजवंतांची मदत केली पाहिजे ही अपेक्षा व्यक्त केली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले आणि मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध नृत्य कला सादर करीत उपस्थितांची दाद मिळविली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक शेख मुक्तार यांनी केले तर उपस्थितांचे आभार ज्ञानेश्वर नागरगोजे यांनी मानले.

# म्हणूनच लोक नमितातांई मुंदडा यांच्या नेतृत्वावर प्रेम करतात..!

केज विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार नमिता अक्षय मुंदडा यांचा आज वाढदिवस. सर्वप्रथम, त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा..! अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने त्या सध्या मतदारसंघात नसल्या, तरी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव निश्चितच होणार आहे. केज, अंबाजोगाई, नेकनूर तसेच इतर प्रमुख ठिकाणी कार्यकर्त्यांनी शुभेच्छांचे बॅनर लावलेले दिसत आहेत. वाढदिवस म्हणजे जीवनातील एक वर्ष मागे पडले, असे जरी असले, तरी तो आत्मपरीक्षणाचा आणि अवलोकनाचा दिवसही असतो. केज मतदारसंघाच्या राजकारणात मुंदडा घराण्याची सून म्हणून त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरूवात झाली. मात्र, स्व.विमलताई मुंदडा यांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांनी अल्पावधीतच सामान्य लोकांची मने जिंकली. मनमिळावू आणि शांत स्वभाव, सोज्वळ वागणं - बोलणं, अंगी असलेली नम्रता या गुणांमुळे त्या खर्या अर्थाने भारतीय स्त्री संस्कृतीला शोभतात. आमदार असल्याचा किंचितही अहंकार त्यांच्या स्वभावात नाही. सर्वसामान्य लोकांमध्ये मिसळून राहणे, संवादकौशल्य आणि प्रत्येकाची अस्थेवाईक चौकशी करणे या सद्गुणांमुळे केज मतदारसंघातील सर्व जाती - धर्मांचे लोक त्यांच्यावर प्रेम करतात. याच प्रेमाच्या बळावर त्या सलग दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्या. एका वाक्यात सांगायचे तर, त्यांनी मागील पाच वर्षांत विकासाच्या रूपाने जणू काही प्रयागराजच्या कुंभमेळ्यातून गंगाच आणली, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. मुंदडा घराण्याची सून म्हणून त्या आल्या, तेव्हाच मतदारसंघाचे भविष्यातील नेतृत्व त्यांच्या हातात जाणार, याची चाहूल लागली होती. स्व.डॉ.विमलताई मुंदडा यांनी तब्बल बावीस वर्षे मतदारसंघाचे नेतृत्व केले आणि जनसेवा हेच आपले ध्येय ठेवले. त्यांच्या निधनानंतर केवळ कुटुंबाचीच नव्हे, तर संपूर्ण मतदारसंघाची जबाबदारी आमदार नमिताताईंनी समर्थपणे स्वीकारली. मुंबईसारख्या महानगरातील शिक्षण घेतलेल्या एका मुलीने ग्रामीण भागात स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करणे सोपे नव्हते. मात्र, भाजपा नेते नंदकिशोर मुंदडा आणि युवा नेते अक्षयभैय्या यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी एक एक पाऊल सावधपणे टाकत सासूबाईंच्या वारशाला योग्य न्याय दिला. सुरूवातीला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काम केल्यानंतर २०१९ मध्ये पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने त्या भाजपात आल्या. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्या केज विधानसभा मतदारसंघातून निवडून आल्या. त्यावेळी महाविकास आघाडी सरकारच्या काळात विकासकामांसाठी निधी मिळविण्यात त्यांना अडचणी आल्या. मात्र, शिंदे-फडणवीस सरकार आल्यानंतर अवघ्या अडीच वर्षांत त्यांनी केज मतदारसंघासाठी दोन हजार कोटी रूपयांपेक्षा अधिक निधी आणला. या निधीतून अंबाजोगाईच्या शहरात सिमेंट रस्ते इतके सुंदर झाले की, गल्ली बोळातदेखील अभूतपूर्व बदल झाले. 'असा विकास न भूतो न भविष्यति..!' असंच म्हणावं लागेल. यासोबतच त्यांनी अंबाजोगाई शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी विशेष प्रयत्न केले. नगरपरिषदेच्या उद्यानांचा विकास, योगेश्वरी मंदिर तीर्थक्षेत्र, आद्यकवी मुकुंदराज यांच्या वास्तूंचा विकास, हत्तीखाना आणि इतर ऐतिहासिक स्थळांचे पुनरूज्जीवन अशा विविध उपक्रमांत त्यांचा पुढाकार आहे. मतदारसंघातील रस्ते, विद्युतपुरवठा, कृषी वीज, रूग्णालये, बंधारे, सर्वधर्मीय देवस्थानांची पुनर्बांधणी आदी विकासकामे वेगाने सुरू आहेत. नुकतेच त्यांनी कृषी तंत्र विद्यालयातील वसतिगृहांसाठी ३० कोटी रूपयांचा निधी आणला आहे. अंबाजोगाई शहरातील पाणीपुरवठा प्रश्नासाठी त्यांनी २०० कोटी रूपयांची योजना मंजूर करून आणली, काळवटी साठवण तलावाची उंची वाढवण्याचा प्रयत्न केला आणि मतदारसंघातील अनेक मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील राहिल्या. नमिताताई या स्वतः आर्किटेक्ट असल्याने विकासकामांमध्ये त्यांची विशेष आस्था आहे. फक्त निधी मिळविणे नव्हे, तर त्या कामांची गुणवत्ता तपासणं आणि योग्य देखरेख करणं हा त्यांचा स्थायीभाव आहे. कोणतीही विकासकामे दर्जेदार असावीत, याकडे त्यांचे लक्ष असते. भ्रष्ट शासकीय अधिकाऱ्यांना जाब विचारून त्यांनी पारदर्शक प्रशासनाची गरज अधोरेखित केली. त्यांचे राजकीय जीवन हे सकारात्मक विचारधारेचे आहे. द्वेष, कट्टरता किंवा भेदभाव न करता सर्वांना सोबत घेऊन काम करण्यावर त्यांचा भर असतो. त्यामुळेच केज मतदारसंघातील जनतेने त्यांना पुन्हा एकदा निवडून दिले. विधानसभेतही त्यांनी ऊसतोड कामगार, शेतकरी, क्रीडा, रस्ते, आरोग्यसेवा यांसारख्या विषयांवर प्रभावीपणे आवाज उठवला आहे. राजकारणात पारदर्शकता आणि जनसेवा या दोन बाबींवर त्यांचा कटाक्ष असतो. आमदार असूनही त्यांच्या वागण्यात गर्व नाही. विकासाची संकल्पना आणि निधी कसा आणायचा याचा त्यांना परिपूर्ण अभ्यास आहे. युवा नेते अक्षय मुंदडा त्यांना खंबीर साथ देत असून, शासकीय कामांचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांची विशेष मदत होते. त्यांच्या नेतृत्वाची खासियत म्हणजे कुणाचाही द्वेष नाही, फक्त सकारात्मक भूमिकेतून विकासासाठी काम करणे.. त्यामुळे पक्षातील वरिष्ठ नेते माननीय मंत्री महोदया ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याशी त्यांचे अतिशय चांगले संबंध आहेत. त्यामुळे शासकीय योजनांचा पाऊस या मतदारसंघात पडत असतो. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेत नुकतेच धर्मादाय खासगी रूग्णालयांच्या विधिमंडळ तपास समितीच्या अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एकूणच, 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' या तत्वावर चालणाऱ्या नमितातांईच्या नेतृत्वाखाली केज मतदारसंघाने विकासाच्या नव्या उंची गाठली आहे. जिल्ह्याच्या राजकारणात त्यांचे स्थान अजून भक्कम होत आहे. त्यांच्या माध्यमातून केज मतदारसंघाला एक अभ्यासू, निःस्वार्थी आणि विकासाभिमुख नेतृत्व लाभले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ही त्यांच्या नेतृत्त्वाखाली पक्षाला मोठे यश मिळेल यात शंका नाही. अशा या केज मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेच्या लाडक्या नेतृत्वास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!



- राम कुलकर्णी
(भाजप प्रदेश प्रवक्ता)